# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२४**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष आठवे / अंक १२ / डिसेंबर २००७

## संपादकीय

## न कळे यातुनि काय साधिसी...

जीवनात जिंकण्याची लालसा व यशाच्या माध्यमातून मिळालेला पैसा या गोष्टी आजकाल पटकन कोणाच्याही डोक्यात जातात. यश म्हणजेच पैसा आणि पैसा म्हणजेच सुख या समीकरणांमुळे माणसाची वृत्ती प्रवृत्ती व नियत लगेचच बदलते. याबरोबरच उदार आर्थिक धोरण, जागतिकीकरण आणि संपर्क सुलभतेमुळे पैसा ही सहज साध्य बाब झाली आहे. त्यामुळे जीवघेण्या स्पर्धेत उतरायचे, बरोबरच्या स्पर्धकाचा सर्व नीती, नियम बाजूला ठेवून पाडाव करायचा; त्यासाठी सर्वप्रकारचे डाव खेळायचे हा आजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.

गेल्या एक तपाच्या दरम्यान झालेला हा बदल इतका अनाकलनीय व वेगवान आहे की पूर्वापार चालत आलेली मूल्ये, नातेसंबंध, जीवनविषयक संकल्पना या सर्वांचा पार चेंदामेंदा झालेला अनुभवास येत आहे. डार्विनचा सक्षम असेल तोच तरून जाईल हा सिध्दांत या बदलत्या जगात आपले अस्तित्व वेगळ्याच प्रकारे सिद्ध करीत आहे. त्यामुळे बदल पचवणे हेही आवाक्याबाहेर होत चालले आहे.

या विचित्र सामाजिक परिस्थितीत यश व पैसा यांची सांगड घातली जाऊन पैसा हे जीवनसर्वस्व बनले; या स्थितीचा परिणाम मानवी संबंधांवर होऊ लागलेला आहे. पूर्वी नाते संबंधात आढळणारी आत्मीयता, माणूस पणाची भावना संपत जाऊन व्यावहारिक कोरडेपणा वाढत चालला आहे. माणसे वापरणे व गरज संपली की सर्व अस्तित्वासह त्यांना आपल्या उंचावत जाणाऱ्या आलेखातून वजा करणे, फेकून देणे हे अगदी नित्याचे झाले आहे.

तंत्रविज्ञानाची तथाकथित प्रगती (की वाढ) त्यातून निर्माण झालेली कार्पोरेट पद्धती, तिचा अतिरेक आणि या आयटीग्रस्त समाजाची सांस्कृतिक समज आज रोगग्रस्त अवस्थेत आहे. पंचवीस तीस वर्षे संबंध असणाऱ्या, व्यवस्थेला उपयोग असणाऱ्या कार्यक्षम अधिकाऱ्याला कोणतीही पूर्व कल्पना न देता व्यवस्थेतून दूर केले जाते, हे आजचे वास्तव आहे. इंग्रजीत One Fine Morning म्हणतात, अशा एखाद्या अनपेक्षित क्षणी त्या व्यवस्थेतील जुन्या, सर्व तांत्रिक क्षमता प्राप्त केलेल्या ज्येष्ठ अधिकाऱ्याला एकाएकी दूर सारणे, यात माणुसकीविरोधी काही आहे, गैर आहे असे वाटेनासेच

(पृष्ठ क्रमांक ४०वर)




वर्ष आठवे / अंक १२ / डिसेंबर २००७

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ६वा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ ११९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | अरुणाचलम् येथील रमण महर्षी | श्री. शंकरराव मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ७ |
| ३) | अमेरिकेतल निसर्गाचा रंगोत्सव | श्री. नरेंद्र नाडकर्णी | १५ |
| ३) | संत पुरंदरदास एक महान भगवद्भक्त | सौ. उषा जयंत कळमकर | १९ |
| ४) | पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास | श्री. शशिकांत पा. गाणार | २३ |
| ५) | स्वातंत्र्योत्तर भारत आणि राष्ट्पती परिचय -डॉ. राजेंद्रप्रसाद | श्री. चंद्रकांत शिंगाडे | २७ |
| ६) | २१व्या शतकातील भावी शिक्षक - | श्री हेरंब कुलकर्णी व सौ. वृषाली किन्हाळकर | २९ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

### प्रकरण दुसरे

# अरुणाचलम् येथील रमण महर्षी

*आत्मशोधावर भर असणारे व भूत दयेने अंतःकरण पिघळणारे रमणमहर्षी. त्यांच्या जीवनापासून खूप शिकता येण्यासारखे आहे. - संपादक*

**मातोश्रींचा सहवासः-**

मातोश्री पुनः तिरुवनमलाई येथे आल्या. त्या वारंवार भेटी साठी येऊ लागल्या. खिस्ताब्द १९१४ मध्ये त्या अतिशय आजारी पडल्या. स्वामी त्यावेळी विरुपाक्ष गुहेत होते. त्यांनी मातोश्रींची काळजीपूर्वक शुश्रूषा केली. आणि त्या बऱ्या होऊन मदुराईला परतल्या. मध्यंतरीच्या काळात त्यांच्या कुटुंबामध्ये बरीच वाताहत झाली. खिस्ताब्द १९०० साली वडील मुलगा दिवंगत झाला. थोड्या दिवसातच दीर मृत्यू पावला. खिस्ताब्द १९१५ साली नागसुंदरम् याची पत्नी निधन पावली. तिला एक लहान मुलगा होता. त्याचा सांभाळ करणे मातोश्रींना जड जाऊ लागले. अशा दुःखद घटणामुळे खिस्ताब्द १९१६ साली त्या स्वामींकडे राहावयास आल्या.

स्वामी स्कंदाश्रमाच्या अधिक प्रशस्त जागेत राहावयास आले. आईने मुलासाठी व येतील त्या भक्त गणांसाठी जेवण तयार करावयास सुरुवात केली. काही दिवसांनी लहान मुलगा पण तिथेच राहावयास आला. आश्रमाला वेगळेच स्वरूप प्राप्त झाले. हळूहळू अथितींची संख्या वाढत गेली. आपली माता या नात्याने तिला विशेष सोयी प्राप्त व्हाव्यात, असे स्वामींना कधीच वाटले नाही. उलट अनेक भक्तजनांपैकी ही एक अशीच भूमिका त्यांची होती.

मातोश्रींचे पुढील आयुष्य स्वामी घडवीत होते. तिच्या आंतरिक जीवनाची उभारणी करण्यासाठी शांतपणे आध्यात्मिक मार्गाचा अवलंब ते करीत होते. तसेच तिच्या मनात असलेले जुने समज काढून टाकत असत. अशी सहा वर्षे गेली. मातोश्रींचा अंतसमय जवळ येऊ लागला तसा स्वामींचा सहवास त्यांना जास्त लाभला. १९ मे १९२२ रोजी अंतसमयी प्रातःकाळी ते मातोश्रीजवळ बसले. ते रात्री आठ वाजेपर्यंत - तिचा आत्मा परमात्म्यात विलीन होईपर्यंत - स्वामींनी आपला उजवा हात तिच्या हृदयावर व डावा हात तिच्या डोक्यावर ठेवला होता. दुपारी जेवणाचीदेखील फिकीर केली नाही. मातोश्रींची जीवन ज्योत मावळल्यावर उठले आणि भावयुक्त आवाजात म्हणाले - आता आपण जेऊ शकतो. या इथे कोणत्याही प्रकारची अपवित्रता नाही. ती संपूर्ण रात्र भजन करण्यात सर्वांनी घालवीली.

मातोश्रींच्या अंत्य संस्कारवेळी स्वामी शांतपणे एका प्रेक्षका सारखे बसले होते. टेकडी पलीकडील पळीतीर्थम्‌ला प्रेत नेण्यात येऊन अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या स्थानी मागाहून दगडी बांधकाम करण्यात आले. त्यावर एक लिंग स्थापन केले गेले. याला मातृभूतेश्वराचे मंदिर असे म्हटले जाते. हे मंदिर नित्य पूजेचे स्थान झाले. त्यावेळेपासून त्या महिन्याच्या (वैशाख - सौरवर्ष) वद्य नवमीला दरवर्षी महापूजा करण्यात येते. स्वामी म्हणत, ती मृत नाही तर ती अनंतात विलिन झाली.

याच संदर्भात ते आणखी म्हणाले - तिच्या डोक्यावर व हृदयावर माझे हात दहा ते बारा तास होते. कारण त्यावेळी तिच्या अंगभूत प्रवृत्ती, वासना व भविष्य काळातील शक्यतेकडे फळ निर्माण करणारे, पूर्व अनुभवावर आधारित सूक्ष्म स्मरण अत्यंत कार्यक्षम झाल्या होत्या. बाह्य जाणीव गेल्याने सूक्ष्म जाणिवेसमोरून एका मागून एक देखावे सरकत होते. ज्यासाठी पुनःजन्म घ्यावे लागले असते. अशा

अनुभवातून आत्मा जात असताना मी विशेष प्रकारचा स्पर्श हाताने दिल्याने ती प्रक्रिया जलद गतीने होऊ लागली. शेवटी तो आत्मा अखेरच्या सर्व श्रेष्ठ शांति निर्वाण समाधिमधे पोचण्यापूर्वीच अज्ञानाकडे परत वळणार नाही या साठी त्यावर घट्ट बसलेली अज्ञानाची आवरणे काढली गेली. अशा प्रकारे ती अनंतात विलिन झाली.

**स्वामींनी मुक्काम हालविला:-**

टेकडीवरील स्कंदाश्रमातून स्वामी वारंवार या स्थळी येत असत. ते एकदा म्हणाले कोणीतरी मला इथे आणून बसविले. मी तो आदेश पाळला. इथे त्यांचा नवीन अध्याय सुरू झाला. त्यांचा मुक्काम हलविल्यामुळे मातोश्रींच्या समाधीवर छप्पर उभे राहिले. परिसरात काही झोपड्या झाल्या. पाण्याची सोय पण स्वामींनी करून दिली. स्वामी बराच वेळ तेथे घालवू लागले.

**आश्रमावर दरोडा:-**

एकदा आश्रमावर दरोडा पडला. २६ जून १९२४ रोजी काळोख्या रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास आश्रमवासी व स्वामी विश्रांती घेत असताना आश्रमावर दरोडा पडला. सहा माणसांच्या टोळीने खिडकीची तावदाने फोडली. स्वामी त्यांना म्हणाले - इथून नेण्यासारखे काही नाही. दरवाजा उघडा आहे. आत येऊन पहा. आश्रमवासी अस्वस्थ झाले. चोराना बदडून काढावेसे त्यांना वाटले. स्वामींनी त्यांना तसे करू दिले नाही. ते म्हणाले त्या चोराना आपले काम करू द्या. आपणाला क्लेश सहन केलेच पाहिजेत, त्यांनी फक्त आजारी असलेल्या कुत्र्याला तेथून बाहेर काढले. मग स्वामी आश्रमवासीयांसह बाहेर पडले. बाहेर पडताना चोरांनी त्यांना मारले. स्वामींना पण चोरांनी प्रसाद दिला. चोरांनी कंदिल मागितला तो त्यांना देण्यात आला. चोरांना फक्त दहा रुपयापर्यंतची संपत्ती मिळू शकली त्यांचा अपेक्षाभंग झाला. स्वामी आश्रमवासियांना म्हणाले, आपण साधू आहोत. आपण आपला धर्म सोडू नये. हे इसम अज्ञानाने अंध झालेले आहेत. दाताखाली जीभ चावली गेली असता काय दात पाडून टाकतो? ते चोर सुमारे दोन वाजता निघून गेले.

**भूतदया:-**

चोर आले असता आजारी कुत्र्याला आश्रमातून सुरक्षित जागी हालविले. स्वामींना पशुयोनीतील प्राण्यावर निरतिशय प्रेम होते. त्यांना मानवी जीवा सारखे ते वागवत. पशूंचा उल्लेख करताना ही मुले आहेत असे ते करीत. या सर्व प्राण्यात - विशेषतः कुत्री, मांजरे, माकडे, गाई, इत्यादीत लक्ष्मी गाय ही प्रमुख होती. तिने आश्रमाला बरीच वासरे दिली. १९०० साली एक म्हातारी स्वामींना नित्य पालेभाज्या आणून देत असे. तिचा सध्याचा अवतार म्हणजे ही लक्ष्मी गाय होय, असे सांगत, लक्ष्मीला एका प्रशस्त गो शाळेत ठेविले होते. १८ जून १९४८ रोजी शांतपणे लक्ष्मीने प्राण सोडला, तिला सन्मानाने स्वामींच्या दालना समोरील जागी मूठमाती देण्यात आली. आणि चबुतारा बांधण्यात आला. स्वामींनी लिहिलेला मृत्यूलेख तिथे एका फरशीवर खोदून लावला. तिच्या आकाराइतकाच गायीचा पुतळा तिथे उभा करण्यात आलेला आहे. महर्षींच्या सहवासात कुत्री, मांजरे, माकडे इत्यादी सह साप आदी इतर प्राणीही होते. त्यांच्या पासून कुणालाही कधीच त्रास झाला नाही.

**महर्षींचे दर्शन:-**

महर्षींचा जन्म महोत्सव सोहोळा मोठ्या उत्साहात पार पडत असे. त्यांचे दर्शन व कृपा प्रसाद या साठी भक्त गणांना ही नामी संधी असे. निवास व भोजनाची सोय केली जात असे. त्यांच्याकडे येणारे लोक मात्र त्यांच्यापुढे समस्या उभ्या करीत. सर्वाभूती दया आणि सहानुभूती यांचाच प्रत्यय लोकाना येई. हे सर्व लोक स्वामींच्या अनुग्रहासाठी येत असत. त्यात श्रीमंत, गरीब,

पुरुष, स्त्रिया, मुले, ब्राह्मण व इतर जातीतील लोक असत. स्वामी सर्वांकडे एकाच समतेच्या दृष्टीने पाहात.

**महर्षींची शिकवण:-**

महर्षींची मुख्य शिकवण अशी होती - 'तुम्ही स्वतःला जाणून घ्या' आत्मशोधावर त्यांचा नेहमी भर असे. आध्यात्मिक उंची गाठायची असेल तर हा शोध अतिशय जुरुरीचा आहे. सर्व धर्म अखेरीस याच एका मुद्याकडे येतात. ज्याने उच्चतम अनुभूती घेतली असेल त्याला केवळ ग्रंथांचा काय उपयोग? जेव्हा सूर्य प्रकाशतो तेव्हा तो का व कसा प्रकाशतो हे समजण्याची गरज भासते का? तहानेने व्याकूळ झालेला माणूस समोर आलेले थंड पाणी ते कोठून आले हे कळेपर्यंत पिण्याचे थांबतो का?

महर्षींकडे आलेली कोणतीही व्यक्ती - दुःख परिहारासाठी आलेली असो, वा आध्यात्मिक ज्ञान प्राप्तीसाठी आलेली असो, किंवा जिज्ञासेपोटी आलेली असो नेहमीच समाधानाने परतत असे. प्रत्येकाला त्याच्या क्षमतेनुसार ज्ञान मिळत असे. तसेच काहींना आंतरिक अनुभूती मिळाल्याने त्यांचे उर्वरित आयुष्य बदलून जाण्यास मदत होत असे.

**आश्रमाचा विस्तार करण्यात आला:-**

भक्त गणांची वा दर्शनार्थींची वर्दळ वाढू लागली. त्याप्रमाणात आश्रमाचा विस्तार होत गेला. सांप्रत रमणाश्रम जलद गतीने वृद्धिंगत होत आहे. सध्या तेथे इमारती आणि निवास स्थाने बांधली जात आहेत.

दर्शनार्थी पॉल ब्रन्टन म्हणतात, अंतर्यामीचा दीप तेथे प्रज्वलित होत असल्याने स्वामीजींच्या सानिध्यात वरचेवर यावेसे वाटते. त्यांच्या नेत्रातील प्रखर आध्यात्मिक किरणांनी प्रत्येकाच्या मनाला एक प्रकारची प्रकाशमान अवस्था लाभत असे. अद्‌भुत शक्तीचा अंतर्भाव त्यात असे. महर्षींचे डोळे अर्धवट अंधारातून चमकणाऱ्या दोन ताऱ्यासारखे दिसत असत. माझ्या आठवणीत कोणत्याही ऋषीचे डोळे इतके वैशिष्ट्यपूर्ण दिसले नाहीत. मानवी नेत्र दैवी शक्तीला प्रतिबिंबीत करू शकतात. ऋषिमुनी तसे करतात हे सत्य आहे.

**आश्रमातील दैनंदिनी:-**

महर्षी पहाटे चार वाजता उठत. सर्व आश्रमवासीय स्नानादी आटोपून दालनात ध्यानधारणा किंवा भजन म्हणण्यासाठी जमत. सूर्योदयाचेवेळी महर्षी बहुतेक स्वयंपाक घरात काम करत असत. प्रत्येकाला रोजचे काम वाटून देण्यात येत असे. अगदी भाजी चिरण्यापासूनची कामे पार पाडली जात. मग भोजनाच्या दालनात सकाळची न्याहारी व कॉफीसाठी जमत.

हळूहळू भेटीला लोक येत असत. छापखान्यातून आलेले छापखान्याचे कागद तपासणे, प्रश्नाची उत्तरे देणे आदी कामात महर्षी गुंतुन राहात. काही आश्रमवासीय बागेतील कामे, पूजा, स्वयंपाक आदि त्यांना नेमून दिलेल्या कामांत व्यग्र होत असत. बाहेर थांबलेल्या गरीबांना आणि पाळीव प्राण्यांना अन्न आणि खाद्य देऊन झाल्यावर ११.३० वाजता भोजन चालू होत असे.

आलेल्या टपालाचे पत्र वाचन व इतर कामे केली जात. पुस्तक बांधणी, पत्रावळी लावणे व आश्रमातील इतर कामे तसेच लक्षात येतील ती कामे केली जात.

दुपारी ३ वाजता कॉफी होई. त्यानंतर लोकांची ये जा सारखी सुरु होत असे. प्रश्नोत्तराची ही वेळ असे. योग्य प्रश्नांची उत्तरे महर्षी तत्काळ देत. उगाच काही विचारणाऱ्याला ते उत्तर देत नसत. लोक भेटी दाखल फळे इत्यादी आणत. ती सर्व उपस्थित असणाऱ्या दर्शनार्थींमध्ये वाटले जाई. त्यांचा संग्रह कधी होत नसे.

सूर्यास्त समयी ध्यान धारणा केली जात असे. आधी मंत्र पठण केले जाई. ७.३० वाजता रात्रीचे भोजन होत असे. पुनः थोडा वेळ ध्यान धारणा होत असे रात्री

९ वाजता झोपणे. असा आश्रमातील दैनंदिन कार्यक्रम असे. उत्सव दिनांच्या दिवशीही या कार्यक्रमात खंड पडत नसे.

महर्षींना वैयक्तिक कोणतीच गोष्ट आवडत नसे. जन्म सोहळ्या बद्दल त्यांची नाराजी असे. पण भक्त ती आग्रह पूर्वक साजरा करीत. सारा खर्च भक्तांच्या देणगीतूनच होत असे. काही मंडळी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम साजरा करीत. महर्षींचा पोषाख फक्त एक लंगोटी. तोच कायम होता. हार इत्यादी ते कटाक्षाने टाळीत. आश्रमात अभिषेक आदी प्रकारचा भव्य सोहोळा कधी झाला नाही. महर्षींनी कधीही द्रव्य स्वीकारले नाही. कालांतराने त्यांचे बंधू निरंजन दास स्वामी - हे आश्रमाचे सर्वाधिकारी म्हणून काम पाहू लागले - यांनी आश्रमाच्या कामात साधेपणा अति काटकसर यांचा पायंडा पाडला.

**अरुणाचलम् येथील उत्सवः-**

महर्षी पॉल ब्रन्टन यांना एकदा म्हणाले, या पर्वतावर विविध पातळीवरील जीव समूहापासून तहत विलक्षण शक्ती संपन्न अशा उच्चकोटीतील साधू पर्यंत अनेकांची वसति आहे. जेव्हा माझा त्यांच्याशी प्रथम परिचय झाला तेव्हा त्या साधूंनी कृपाळूपणे उत्थान देऊन माझे स्वागत केले.

या अरुणाचलम्ला कार्तिक दीपोत्सवाच्या वेळेस दहा लाखाहून अधिक यात्रेकरू येतात, आणि आश्रमालाही भेट देतात. सायंकाळी ६ वाजता या टेकडीवर प्रचंड दिव्य ज्योत उजळून निघते. त्यावेळी सर्व लोक दंडवत घालतात. ज्योत प्रज्वलित केली जाते. त्या कटाहात जमलेला कापूर व तूप बरेच दिवस जळत राहातो. आणि ती ज्योत आसमंतात मैलो मैल दिसत असते. या टेकडीवर घनदाट झाडी असल्याने वन्य प्राणी देखील राहातात. या टेकडीवरील काही स्थाने आल्हाददायक आहेत, येथील वडाच्या झाडाची पाने खूप मोठी आढळतात. एका पानावर देखील जेवण करता येते. मात्र ही टेकडी चढावयास कठीण आहे. टेकडी भोवतालचा रस्ता चांगला आहे. अनेक भक्त टेकडीला प्रदक्षिणा घालतात. काही वेळा महर्षी प्रदक्षिणा घालीत त्यावेळी अनेक लोक पाठीमागून जात. एक प्रकारे उत्सवासारखेच त्याला स्वरूप येत असे. खूपच गर्दी होऊ लागल्याने महर्षींनी प्रदक्षिणा स्वतः घालण्याचे सोडून दिले.

कार्तिक महिन्याचा कार्यक्रम चालू झाला म्हणजे टेकडीवरील दिव्य ज्योतीसाठी संध्याकाळी भक्तमंडळी महर्षी भोवती जमत. ती दिव्य ज्योत उजळताच महर्षी समोर दुसरी ज्योत लावली जात असे. नंतर स्वामी रचित तमिळ मधील अरुणाचलम्च्या स्तुतीपर असलेले 'अक्षर मणी मले' हे स्तोत्र गाईले जाई. याचा एकंदर प्रभाव जनमानसावर अतिशय पडत असे. या कार्यक्रमासाठी खूप लांबून भक्तजन येत असत. 'अरुणाचलम्' अष्टकही भक्त रोज म्हणत असत.

**आणखी काही विशेष उत्सवः-**

**श्री रमण जयंती (डिसेंबर - जानेवारी)**

महाशिवरात्री (फेब्रुवारी - मार्च) शिव व विष्णु रूपात येथे वास करतात. त्या दिवशी मंत्र जागरण भगवान आराधना - (एप्रिल - मे) महर्षी रमण महानिर्वाण दिन. महापूजा - मातोश्रींचा समाधी दिन. नवरात्र - दसरा - (सप्टेंबर - ऑक्टोबर) नऊ दिवस मातृ देवतेची आराधना, सायंकाळी मशाल मिरवणूक या प्रमाणे कार्यक्रम होतात.

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

यज्ञ या शब्दाच्या अनुषंगाने चिंतन असणारा हा लेख वेद व यज्ञ आणि भारतीय संस्कृती या वरील हे चिंतन विचार प्रवृत्त करणारे आहे. संपादक

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील कित्येक अंकांतून मी एका मुद्द्याचा वारंवार उल्लेख व विस्तार करीत आलो आहे. भारतीय संस्कृतीचे खरे, मूळ बीज वेदज्ञानात व वचनात (ऋचा) आहे. अर्थात हे समजण्याकरिता 'यज्ञ', 'योग, तंत्र,मंत्र, सोम' उध्वरेत क्रिया श्रीविद्या-श्रीयंत्र, वगैरे संकल्पना व त्या क्रिया प्राप्त होणे आवश्यक आहे.

**यज्ञ भारतीय संस्कृती आधार**

डॉ. रामनाथ वेदालंकार, विद्यामार्तंड, M.A., Ph.D. म्हणतात, '' भारतीय संस्कृती के आधारभूत तत्त्वों में से 'यज्ञ' एक है । यह कहना अधिक ठीक है कि 'यज्ञ' भारतीय संस्कृति का प्राण है ।

पण, 'यज्ञ' नाव घेतले की तुमच्या समोर जी बहिर्गत क्रिया - यज्ञकुंड, अग्नि, तुप, समिधा व वेदमंत्रांची उच्चारण उभी राहते, तिला थोडा धक्का नक्कीच बसेल!!

कारण, डॉ वेदालंकार पुढे म्हणतात, 'आर्य मानव जब माता के गर्भ में होता है, तभी 'यज्ञ' द्वारा 'संस्कृत' होना प्रारंभ हो जाता है । यज्ञ के वातावरणमें ही वह जन्म लेता है, यज्ञ द्वारा पालित-पोषित होता है, यज्ञ द्वारा ही अपना समग्र जीवन व्यतीत करता है, अन्त मे 'यज्ञ' द्वारा ही अपनी इहलोक लीला (जीवन यात्रा, संसार) को समाप्त करता है।

अरे बापरे!! म्हणजे 'यज्ञ' ही संकल्पना अगदी निराळी आहे!!

''पुरुषो वाच यज्ञः।

छांदोग्य उपनिषद ३.१६

''मानवाचे सर्व जीवन हाच एक मोठा यज्ञ आहे.'' आदर्श आर्य मानवाचे आयुष्य ११६ वर्षे होते. त्यांतील तीन भाग

प्रातः सवन : २४ वर्षे
माध्यदिन सवन : २४ वर्षे
तृतीय सवन : ४८ वर्षे

**यज्ञ व सृष्टी उत्पत्ती**

ह्या विवेचनाचा सरळ अर्थ हा आहे की 'यज्ञ' ही एक 'गूढ' वैदिक क्रिया आहे. त्या क्रियेत् आपआपल्या अधिकाराने भाग घेणारे दृश्य, अदृश्य भाग किंवा अवयवी साधने, पदार्थ, शक्ती यांची संपूर्ण गणना करणे ही कठीण आहे. पण, एक गोष्ट नक्की की ह्या 'यज्ञ' क्रियेची संकल्पना विश्वनिर्मितीच्या प्रक्रियेशी जोडलेली आहे. बीजही 'व्यक्त' जगात अव्यक्त' जगांत आहे. विश्वाची निर्मीती व चलन ह्या दोन्ही गोष्टी वैश्विक 'यज्ञ' ह्या संकल्पनेवर आधारित आहेत. पुरुषसूक्तामध्ये हे सत्य सांगितले आहे.

प्रथम 'पुरुष' ह्या शब्दाचा किंवा संकल्पनेचा खरा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. ह्या प्रचंड विश्वालाच 'विराट पुरुष' किंवा ब्रह्मांड असे म्हणतात. मानवी शरीराच्या 'फॉर्म'मध्ये ह्या Biological यंत्राच्या ज्या व्यवहाराची संकल्पना शक्तीची अनुभूती व परिचय होते तीच विश्वाच्या संकल्पनेशी जोडून आपल्याला मदत केली आहे. ऋग्वेदात १०व्या मंडलात १३व्या सूक्तामधील तीन नंबरची ऋचा अशी आहे. (ऋषी-यज्ञःप्राजापत्यः। देवता-

भावधृत्स्। छंद-जगती; अवशिष्ट त्रिष्टुभ)

''कासीत् प्रमा प्रतिमा किं निदानमाज्यं किमासीत् परिधिः क आसीत्।'' हे सुक्त 'सृष्ट्युत्पत्तिसूक्त' मानले जाते.

डॉ. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव म्हणतात, 'यज्ञकर्मांमुळे सृष्टि उत्पत्ती व सृष्टिसौंदर्य या दोन्ही गोष्टी साध्य झाल्याचे तत्त्व विशद करणाऱ्या या सूक्तात प्रजानिर्मिती (१-२), सृष्टिनिर्मितीच्या 'यज्ञसाधने' (३-५) आणि सृष्टि निर्मितीचक्र क्रम (६,७) या विषयांचा परामर्श आढळतो. ३ऱ्या ऋचेमध्ये सृष्टि निर्माण यज्ञातील 'यज्ञप्रमाण' (प्रमा), देवता (प्रतिमा), यज्ञहेतू (निदान), 'हवि' (आज्य), समिधा (परिधी), 'छंद' आणि मंत्र (प्रउग-शस्त्र) यासंबधीची पृच्छा आहे.

सहाव्या ऋचेत हा ऋषी म्हणतो-

'ऋषी, मनुष्य आणि पितर निर्मिणाऱ्या यज्ञाचे पुरातन यज्ञकर्ते माझ्या मनःचक्षूंना आजहि दिसत आहेत.'

### पुरुष संकल्पना

या सृष्टिनिर्मितीचे 'पुरुषसूक्त' या अत्यंत महत्त्वाच्या 'ॠग्वदेयिन' सूक्तात **'तीन पुरुष'** संकल्पना मांडल्या आहेत. **१) प्रतिमा पुरुष २) प्रमा-पुरुष ) पिण्ड पुरुष ३) निदान पुरुष**

सूक्तामध्ये मध्यम-पुरुष - म्हणजेच भोक्ता (जीवात्मा) ह्यालाच **'दशांगुले पुरुष'** म्हणले आहे. माणसाच्या दोन हाताची मिळून 'दहा बोटे' ही एक विलक्षण योजना आहे. ह्या हाताच्या 'दहा अंगुलींचे' वैशिष्ट्य **फ्रेडरिक एंजल्स** ह्या जर्मन मार्क्सिस्ट इंजिनीयरने (कार्ल मार्क्स चा सहकारी) मान्य केले आहे. (Dialectics of Nature) तसेच कर्नाटकच्या 'वीर शैव' पंथातही 'Head, Heart and Hand' ह्या तीन मानवी आयुधांची महती वर्णन केली आहे. मुद्राशास्त्रातही त्यांचे महत्त्व आहे. 'करन्यास' हा एक प्रमूख न्यास कुठल्याही योग साधनेचे आध्यात्मिक यौगिक क्रियेचे व नादानुसंधान करण्याचे प्रमुख अंग आहे. मानवी शरीराला चैतन्य शरीराला चैतन्य भूमिकेत नेण्यासाठी 'करन्यास' हा आवश्यक आहे. मंत्रशास्त्र व छंदशास्त्र ह्याच्यावर तो आधारलेला आहे. हा जीवात्मा-आत्मा-'अत्'धातूपासून निष्पन्न होतो व ज्ञान, गमनं, प्राप्तिश्चेतिने' शक्तिशाली आहे. त्याची दोन फळे त्याला मिळतात. 'भोग' व 'अपवर्ग'.

भोगाचा संबंध इहलोकाशी आहे - भौतिकाशी आहे. ह्या पृथ्वीवरील सुख दुःख प्राप्तीशी आहे. भौतिक अनुभवांशी आहे. आणि **'अपवर्ग'** म्हणजे उर्ध्व म्हणजेच उन्नतिशी जोडला आहे. ती उन्नति आध्यात्मिक अर्थाने म्हणजे **'आत्म्याच्या उन्नतिशी'** जोडली आहे. जो **'गीताधर्म'** आहे. कॉंशसनेसची गुणात्मक उंची वाढण्यासाठी आहे. **'The Life Divine'** ह्या ग्रंथात महायोगी **श्री. अरविंद घोष** हेच सांगताहेत.

सृष्टिची निर्मिती व रचना ह्याच हेतूने झाली आहे. आजच्या परिभाषेत त्याला **Evolution of Consciousness** असे म्हणता येईल. ही उत्क्रांती 'गुणात्मक' आहे. डार्विन साहेब म्हणतात, तशी फक्त 'Body forms' शी संबधित नाही.

### आत्मयज्ञ व ज्ञान यज्ञ क्रिया

पण, हे मी कां सांगतो आहे? ह्या व पुढच्या कांही लेखांत मी /अमानवी वैधिक वेदज्ञानाचे - 'मानवी बोधज्ञानांत' संक्रमण होण्याच्या क्रियेला ज्या 'क्रिया' अत्यावश्यक आहेत, त्यांचे थोडक्यात वर्णन करणार आहे. त्यांतील 'यज्ञ क्रिया' ही मूलभूत आहे. त्या 'यज्ञ क्रियेमध्ये' कॉंशसनेच्या परिवर्तनाच्या ध्येयासाठी ज्या मौलिक तंत्रांचा, क्रियांचा वापर होतो, तो मानवी बुद्धीच्या, इंद्रियांच्या पलीकडील ज्ञानाचा आहे. पण, त्याची प्रतिनीधिक किंवा

प्रतिकात्मक कल्पना वा धारणा होण्यासाठी म्हणूनच केवळ 'यज्ञाचे कर्मकांड' अत्यंत चातूर्याने रचले आहे. त्यांत, अग्नि, समिधा, आज्य, स्वाहाकार, 'देवता' Energy) त्यांचे आवाहन (Inviting Spirutual Energies in the process) ह्या सर्वांचा अंतर्भाव आहे. ह्या क्रिया समजण्याकरितां त्याला तुम्ही 'यज्ञ' समजता, तो पाहिला पाहिजे. त्या यज्ञ क्रिया करतांना तुम्हाला बहिर्गत, भौतिक जगांतले पृथ्वीवर व जमीनीवर रचलेले यज्ञकुंड (स्थंडिल), हे रूपक शास्त्राच्या व प्रतिक शास्त्राच्या आधारावर, शुद्ध (यजमान' पुरुषाच्या शरीरांतील, 'मस्तिष्क' म्हणजे 'डोके' आहे, हे जाणून घ्यावे लागेल. सर्व यज्ञक्रिया ह्या डोक्याच्या भागांत प्रामुख्याने यज्ञकुंडाच्या, अग्निकुंडाच्या धर्तीवर होणार आहेत. पण त्याच क्रियांच्या 'समांतर (Parallel) 'क्रिया'. संवादी क्रिया ह्या यजमानाच्या डोक्यात, हृदयात, अंतःकरणात व संपूर्ण भावात्मक शरीरात होणार आहेत. हे 'श्रद्धेने' मानावयाला लागेल. 'श्रद्धेने' कां? तर 'पुरावा काय?' असा अनाठायी व गैर, अप्रस्तुत प्रश्न अगोदरच विचारुन, तम्ही एक 'Mental Barrier' खडी करण्याची शक्यता जास्त आहे. हा प्रश्न तुम्ही एखाद्या Allopathy डॉक्टरला गोळी घेण्यापूर्वी विचारत नाही!! का? कारण, तुम्हाला त्याच्या 'भैतिक सत्यतेची खात्री व पुरावा' तुमच्या विज्ञान निष्ठेने समाजाने, राज्ययंत्राने, शिक्षणसंस्थांनी, सामजिक कार्यकर्त्यांनी दिलेला आहे. हे आपले सध्याचे विश्वास आहेत. त्यामुळे पुरावे मागण्याचा प्रश्नच उरत नाही. नाही का?

### Social Network

ह्याच्या उलट ब्रह्मज्ञान, गुरुकुल, मंत्रशास्त्र (गायत्री, दुर्गा, गणेश विद्या, तंत्र) व प्रत्यक्ष 'वेदज्ञान' ह्यांच्या शिक्षण देणाऱ्या सामाजिक यंत्रणा (Network) नेस्तनाबूत झाल्याने - नवीन पिढीला ह्या क्रिया व तंत्राचा वा 'सत्यतेचा, Realityचा, परिचय नाही - अनुभव नाही!! त्यामुळे, ज्या 'आत्मज्ञानावर' ह्या क्रिया भरवंशाने होतील त्या 'आप्तांचा' आपल्याला परिचय वा अनुभव नाही. 'तुमचे आप्त' आतां 'ब्रिटीश, अमेरिकन, युरोपियन भौतिकवादी शास्त्रज्ञ व भौतिकवादी समाज विचारवंतच आहेत. पण, हे सर्व ह्या 'यज्ञ क्रियेबद्दल' अनभिज्ञ आहेत. व ते ह्या फक्त संशय निर्माण करण्यांत गुंतलेले आहेत!!

अडचणींवर मात केल्याशिवाय हे 'सिरीच्यूअल सत्य' आपल्याला जाणवणार नाही - दिसणार नाही!

आतां शरीराअंतर्गत, मनांत, चित्तात होणाऱ्या या यज्ञक्रिया जाणण्याकरितां एका गूढ अंतर्गत कल्पनाशक्तीची मदत लागेल. ह्यालाच पाश्चात्य भाषासंग्रहात **Neuro-Biological - psychic-Spititual internal Actions** असे म्हणतां येईल. ह्या क्रिया स्वयंचलित **In Voluntary** व एका **Self-organised Systems** स्वयंचलित अश्या ईश्वररचित यंत्रणेमार्फत होतील, ह्याची खात्री बाळगा. त्या क्रिया होण्यासांठी शरीराबाहेरील 'यज्ञकुंड, अग्निकुं ड, तूप(आज्य), समिधा व **''स्वाहाकाराच्या क्रिया' रूपकात्मक प्रतीकात्मक पद्धतीने** बघाव्या लागतील व केवळ स्वतःच्या निःशंक, शुद्ध, श्रद्धायुक्त इच्छाशक्तीमार्फत आपल्या शरीरांत घडवून आणाव्या लागतील. ह्यासाठी यज्ञाच्या आचार्याला (हा एक वेदिक ब्रह्मज्ञानी ऋषींचा संच असतो व त्यांची Functions अधिकार, प्रांत हे 'यज्ञक्रियेंमध्ये वाटून दिलेली असतात.) हे सर्व भागाहून सविस्तर पाहूं. पण, सध्या ह्या 'समांतर संकल्पना' वा संवादी संकल्पना कोणत्या ते सूत्ररूपाने सांगतो.

### उरूज्योति -संवादी क्रिया

ह्या संकल्पना 'उरु.ज्योति' ह्या लहानश्या पुस्तकांत (पान १८५वर) '२४-आश्रम-विषयक योग-क्षेम ह्यांत महर्षि अंगिरा व महर्षि भृगु ह्यांच्या संवाद आख्यानांत वर्णलेल्या आहेत.


| बहिर्गत यज्ञ | अंतर्गत यज्ञ |
|---|---|
| १) पुराजश | देवकोश, मस्तिष्क (डोके) |
| २) यज्ञीय यूप (खांब) | मेरुदंड (पाठीचा मणका) |
| ३) द्रोण कलश | शिर |
| ४) प्राण, तूप, आज्य | रेत (वीर्य, Semen) |
| ५) द्रव्ययज्ञ | पुरुष यज्ञ |
| ६) गार्हपत्य अग्नि | Vital (Physical) |
| दक्षिणाग्नि | Psychic, Spiritual forces |
| आहवनीय अग्नि | Energies-reflected & inflamed by fire. |

ह्या महत्त्वाच्या संकल्पनाखेरीज अनेक इतर मदत ह्या संवादरूपाने ह्या ग्रंथात दिली आहे. तिचा जरूर अभ्यास करावा व आपली कल्पनाशक्ती श्रद्धावान, शुद्ध व प्रज्वलित करावी.


ह्या संकल्पनेच्या मदतीकरितां तीन चित्रे जोडली आहेत. ती 'बिहार स्कूल ऑफ योग' व इतर संस्थांच्या ग्रंथातून घेतली आहेत.

भौतिकवादी युरोपियन वैज्ञानिक संस्कृतीचा विश्वास असा आहे कीं मानवाच्या मेंदू (Brain)च्या एकट्याच्या मदतीने सगळ्या वैश्विक ज्ञानाचा बोध, आशय, ध्येये, रचना, व्याप्ति व फायदे मानवाला होऊन शकतील. ह्या ज्ञानाच्या प्रकाशांत सत्य काय, वस्तुस्थिती काय Reality व Truth तसेंच मानवाचे जन्म, मृत्यू, सुख, दुःख ह्या सगळ्यांचे पूर्ण ज्ञान प्राप्त होऊं शकेल. शिवाय आणखी एक अहंमन्य विचार हा कीं ह्या मार्गाखेरीज 'मानवी ज्ञान' दुसऱ्या कोणत्याही मार्गाने उपलब्ध होऊं शकणार नाही. ह्यालाच Thomas Kunh ह्याने 'Paradigm' बंदिस्त विचार, असे म्हटले आहे. त्यामुळे ह्यांतून सुटका करून घेऊन परलोकांत, स्वर्गात, मोक्ष मिळवणे ह्याच जीवनाचा शहाणपणा आहे.


Utthan (raising the kundalini)



चित्र नं. १ (कुंडलिनी, उर्ध्व रेत क्रिया)



पृष्ठ : २०८ वर आम्ही म्हटलेले संचित हृदय ते या चवथे विवरांत आहे.




(पृष्ठ : ५९ व १६०)

रज व रेत या नरकुर्शांत एकत्र होऊन शरीरांत रिचविलें जाते. व प्रतिप्रसव होतो.

चित्र नं २ मस्तिष्क व रेत (वीर्य)

**The Different Yogic Plexuses**



चित्र नं ३ (ब्रह्मांड - पिंड-चक्र-स्थाने)

पॉंड्रिझीया बेचले ही एक महायोगी अरविंद व मदर यांची शिष्या आहे. तिचे म्हणणे असे आहे कीं सध्याच्या युगाची जवळच्या काळातील मीन राशीची प्रवृत्ती आहे. तिचा गुण असा आहे कीं ह्या पृथ्वीवर जो 'जीवात्मा' येतो तो लवकरात लवकर मूळ स्थानी परत जाण्याच्या विचाराने भारलेला असतो. जसे किंडरगार्टन शाळेंत मुले घरीं लवकर परत जाण्यासाठी रडत असतात. आई, वडलांची, भाऊ-बहीणींची आठवण येते. तसेंच कांहींसे!! जीवनाचा उद्देश व भार सहन झाल्याने परमेश्वराकडे, जन्मस्थानाकडे जाण्यांसाठी आतुरलेले असतात व तसेंच त्यांचे समर्थन त्यांच्या तत्त्वज्ञानात असते. अद्वैत, वेदांत, बुद्धधर्म, ख्रिश्चन धर्म व इस्लाम वा इतर अनेक धर्म व पंथ ह्या विश्वासावर जीवन व्यतीत करतात.


उलट, भौतिकवादी, पशूवत समोर दिसणाऱ्या व्यक्त जगाखेरीज कांही अज्ञात, अव्यक्त जीवन, देहानंतरही असू शकेल, यावर बिलकूल विश्वास ठेवण्यास तयार नसतात. आणि मानवी जीवनाचे न सुटणारे जीवन मरणाचे प्रश्न सुटण्याचे फक्त भौतिक वादी प्रयत्न म्हणजेच 'अपूर्ण जाणलेले' प्रश्न सोडण्यात दंग असतात. त्यांची ही लढाई एखाद्या दोऱ्याचा गुंता त्याची दोन्ही टोके न गवसलेल्या गोंधळलेल्या माणसाची असते!!

या सर्व प्रश्नांची उत्तरे भारतीय संस्कृतीत खऱ्या सत्य अशा वेद ज्ञानात आहेत. पण, त्या ज्ञानाची प्रक्षिप्त असंबद्ध, अज्ञानी रूपेच आज प्रचारात आहेत. स्वामी दयानंद व महायोगी अरविंद ह्या दोघांनी विशेषतः ह्या वेददर्शनावर योग्य भाष्य केले आहे.

त्यांतच एक योगी श्री. विष्णु केशव पालेकर उर्फ अप्रबुद्ध (१८८७-१९६७) हे नागपूरचे रहिवासी ह्यांचे नाव घ्यावयाला लागेल. त्यांचे एक भाष्य-'The Science of Yoga' हे आपल्या सध्याच्या लेखातील प्रश्नावर चांगला प्रकाश टाकू शकेल.

"Science Pure and Science Applied are both necessary for the purpose of real Progress.

## The Science of Yoga




चित्र नं ४ : योगशास्त्र-विज्ञान



**1887-1967**
**About the Author**

Shri Vishnu Keshava Palekar alies Aprabuddha was born in 1887 at Paralwads, brought up at Amravati and educated at Nagpur, took active part in revriolionary activaties with Barindra Ghosh. He has associated with Shri Arvind Upasani Maharaj and many mystics Leaving the study of Law, the ultimately surrendered at the feet of Brahmarshi Shri Annasaneb Patwardhan of Pune.

चित्र नं ५ : (अप्रबुद्ध)

Vedanta is the Pure Science of India and Yoga is nothing, but Vedanta applied, They, therefore, form the basic framework of Vedic culture and civilisation and are by themselves adequate to account for them.

The science of Yoga is not a science of mind only. It says' "follow the discipline and see the results."

ह्या विधानांबद्दल मला आणखी एक मुद्दा मांडावयाचा आहे. पाश्चात्य भौतिक विज्ञानाची मागणी अशी असते की जे वैधिक सत्य असते ते त्यांच्या भौतिक क्षमतेच्या लॅबोरेटरीमध्ये सिद्ध व्हावयाला पाहिजे. हे ज्ञानाच्या इतर पद्धतींवर अन्याय करणारे आहे.

शिवाय पाश्चात्य 'पोस्ट मॉडर्न' (Post Modern) विज्ञान Epistemology ज्ञानशास्त्राची बैठक ह्या सत्याला इतकी संकुचीत मानत नाही. एव्हढेच नव्हे तर कित्येक ज्ञानाच्या शाखा ह्या Cultural सांस्कृतिक Geographical भौगोलिक, थोडक्यात Anthrolological differeness मध्ये व्यक्त होते व तिथेच त्याच्या सत्यतेची 'परिमाणे' असतील असे मानते. पाश्चात्य संस्कृतीत जो ख्रिश्चन व इस्लाम धर्मांचा आधुनिक विज्ञानाने कांही बाबतीत पराभव केला त्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर, भारतीय भौतिकवादी तत्वज्ञ व शास्त्रज्ञ भार टेवून, वेदिक, योगिक ज्ञानावर ताशेरे मारतात. नुकताच रंगलेला कॉ. वृंदा करात व योगी रामदेव यांच्यातील वाद ह्या पार्श्वभूमीवर तपासल्यावर याची थोडीशी सत्यता पटेल.

आणखी एक मुद्दा आहे. भारतीय भौतिक ज्ञान हे ज्या संस्कृतीवर आधारलेले होते त्याची वेदज्ञानाचीच मूळ बैठक होती. त्यांतच संस्कृत देवभाषा, हठयोग, राजयोग, ज्योतिशशास्त्र विज्ञान, आयुर्वेद (वगैरे) वृद्धी झाली.


पण, वेदांना अभिप्रेत असलेले 'स्पिरिच्यूअल ज्ञान' ज्ञान हे वेगळ्या पातळीवरचे आहे व त्याची तंत्रे व मार्ग

आणि बैठक जराशी वेगळी आहे. हे सर्व प्रांत सध्या जवळजवळ मृत स्थितीत आहेत किंवा गूढ आहेत आणि त्याची प्राप्ती होणे किंवा त्या ज्ञानाला पुनरुज्जीवन देणे हे महा कठीण काम आहे. त्याची उघड कारण हे कीं त्या ज्ञानात व मार्गात 'जीवात्म्याच्या' भौतिक जगांतील प्रवेशापूर्वीच त्याचा ताबा घेऊन त्याच्या पृथ्वीवरील एका भौतिक जीवनांत किंवा खंडित वैश्विक जीवनांत संस्कार करून पुढील जन्मीच्या संस्कारासाठी त्याची तयारी करण्याची, संपूर्ण यंत्रणा, भारतीय समाजांत पूर्णत्वाने अस्तित्वात होती. त्याचाच भाग म्हणजे १६ संस्कार, गुरुकुल, वेदविद्या व आचार धर्म यांचे शिक्षण देण्याची राज्य व शिक्षण व गृहस्थाश्रम ह्या संस्थांची जबाबदारी होती. धार्मिक चालीरिती, व्रते, सण, कथा, पुराणे वगैरेंचा भर ह्याच भूमिकेवर होता. आज ही सर्व व्यवस्था 'उध्वस्त' आणि बिलकूल उपटून टाकलेली आहे व त्यावर ठायी ठायी अविश्वास रचला आहे!!

म्हणूनच, योगाच्या प्रांतांतही शारिरीक व मानसिक स्थित्यंतर वा संक्रमणाची योजना असणारे हठयोग, राजयोग, भक्तियोग, ज्ञानयोग वगैरे मार्ग जरी उपलब्ध असले, तरी ज्या योग समुच्चाला 'स्पिरीच्युवल योग' 'आध्यात्मिक योग' किंवा 'आत्मयज्ञ' म्हणता येईल अशी तंत्रे व पद्धती आज सहज प्राप्त नाहीत आणि त्यांचे खरे जाणकार नाहीत किंवा त्यांना ह्या विशेष योग क्रियांची Integral View' पूर्ण संकल्पना व हेतू यांची माहिती नाही. ही खेदाची बाब आहे व याची खंत समाजधुरीणांना, तत्त्ववेत्यांना, भारतीय संस्कृतीवर प्रेम करणाऱ्यांना असावी तितक्या प्रमाणांत नाही!!

त्या क्षेत्रात, उध्वरेत कुंडलिनी प्रयोग, श्रीविद्या व श्री यंत्र, सोम रसाची प्राप्ति, ३२ अध्यात्म विद्या, छांदोग्य बृहदअरण्यक उपनिषदातील सर्व विद्या यांचा समावेश करावा लागेल.

पण, ह्या सर्व विद्यांच्या मूळ बैठकीसाठी 'यज्ञ' ही संकल्पना व पद्धत अत्यंत शुद्ध व सत्य बैठकीवर जाणणे



चित्र नं ६ : (Ascansian-Descrisian शक्ति संचलन)

आवश्यक आहे हे निर्विवाद.

मग, काय अडचण आहे?

'यज्ञ' ह्या क्रियेबद्दल त्याची बहीर्गत होणारी दृश्ये डोळ्यासमोर आणा आतां त्यामध्ये 'अग्नि' (fire) प्रज्वलित करून 'समिधा' (Burning or real content transformation) म्हणजे ज्या वस्तूचे परिवर्तन होणार आहे ती मुख्य प्रयोगवस्तू आहे. तूप हे आज्य म्हणजे अग्नि ज्वलित ठेवण्यासाठी व या परिवर्तन होण्याच्या प्रक्रियेला मदत करत आहे. तिथे जे ऋत्विज आचार्य आहे ते हा अग्नि किती वेळ किती उष्णता देईल व कधी विझवावा लागेल ह्यावर लक्ष ठेवून आहेत. शिवाय ह्या 'समिधांचे' परिवर्तन कुठल्या उत्क्रांत पद्धतीत होणार आहे याची पूर्व व पूर्ण जाणीव त्यांना आहे.

गॅसवर जर दूध तापत ठेवले व त्यानंतर त्याचे तुपात परिवर्तन ज्या ज्या क्रियेमध्ये स्वयंपाकगृहात होते. त्या क्रिया सुद्धा एक 'यज्ञक्रियाच' आहेत. त्या दूधाचे तुपांत परिवर्तन पूर्ण होते व त्यानंतर तुपाचे दूधांत उलटे परिवर्तन होत नाही. मानवी अज्ञानाचे रूपांतर ज्ञानात करण्याची क्रिया ही सुद्धा

यज्ञक्रियाच आहे. त्यामुळे पृथ्वीवर वनस्पती, प्राणी, पाणी, जमीन, खडक यांच्याही प्रक्रिया चालूच आहेत. ह्या प्रक्रियांना सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, पृथ्वीचे भ्रमण, उल्कापात, धूमकेतू आपआपल्या व न समजणाऱ्या गूढ शक्तीने मदत करत असतात. ह्या क्रियाही यज्ञक्रियाच आहेत त्यामुळेच भगवान विष्णूला यज्ञपुरुषच म्हणले आहे. तो या वैश्विक क्रियांचा भार वहात असतो. असा दृढ समज आहे.

इथे हा विष्णू कोण हा प्रश्न महत्त्वाचा नसून वैज्ञानिक तर्कशास्त्रात अश्या क्रियांना एखादा प्लॅन, सॉफ्ट वेअर, गव्हर्नर आवश्यक आहे की नाही हा आहे. मग, त्याला विष्णू म्हणा नाहीतर ऐझॅक न्यूटन किंवा डेस्कार्ट म्हणा बिघडत नाही. एरव्ही विश्व ही एक स्वयंचलित यंत्रणा आहे self organising यंत्रणा आहे असा विश्वास असेल तर तशी लॅबोरेटरीमध्ये स्वतंत्र निर्मीती करून दाखवा. तिथेही ह्या यंत्रणेला लागणारे सर्व सामान-लोखंड, तारा, वीज ही सर्व ह्या विश्वानेच वा सृष्टीनेच पुरवली आहेत!! शिवाय, हा शास्त्रज्ञ सुद्धा अश्याच विलक्षण क्रियेने जन्माला आलेला आहे. त्याला त्याच्या जन्माचे, शरीराचे रहस्य माहीत नाही आहे. हे मान्य करा. मग, 'स्वातंत्र्य' कुठले व Self oprganisation म्हणजे कोणती तोकडी, अपूर्ण व्याख्या हे ध्यानात येईल!!

मी हे सर्व प्रतिवाद कां मांडतो आहे? कारण, ह्या विनबुडाच्या शंका एका परिपूर्ण ज्ञानाला म्हणजे वेदिक ज्ञानाला मानवी तोकड्या व क्षीण बुद्धीच्या प्रांतात खेचून स्वतःचे समर्थन शोधत फिरताना आढळत आहेत. हे प्रश्न केवळ 'दोन विश्वासांचे' आहेत. आपल्याला परिचित नसलेल्या विश्वासात जाऊन पूर्वग्रह रहित दृष्टीने पहाण्याची क्षमतासुद्धा कमवावी लागते. सत्य काय हे तेव्हांच समजते!!

हा सर्व वादविवादांचा खटाटोप अश्यासाठी की 'यज्ञक्रिया' व कांही इतर क्रिया हे पूर्वसूरींच्या, ऋषी मुनींच्या संशोधनाचे सार आहे. ह्या क्रिया संकल्पना शोधून त्यांनी पुढे जन्माला येणाऱ्या मानवावर अफाट उपकार करून ठेवले आहेत. ह्या गूढ विश्वाच्या उगमाचा, चलनाचा हेतू, उद्देश मानवी बुद्धीला सहजासहजी आकलन होणार नाही आहे.

ह्या प्रश्नांचा तलास घेतांना ह्या ऋषींनी मानवी शरीराची, बुद्धीची, इंद्रियांची, प्रवृत्तींची पूर्ण तलाशी घेतली आहे. त्यांना जे सत्य व ऋत ज्ञान झाले ते पुढच्या पिढ्यांना उपलब्ध व्हावे त्याचसाठी त्यांनी निरनिराळ्या युक्त्या रचल्या. एव्हढेच नव्हे तर बदलत्या युगातील बदलणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक बदलामधून जाणाऱ्या मानवाला १०,००० वर्षे इतक्या दूरवर पोंचेल अश्या <u>ज्ञानाच्या भाषा</u> निर्माण केल्या, जे शोध लागले त्याचा अत्यंत कल्पक बुद्धीने सार निष्कर्ष काढला व अत्यंत छोट्या पसाऱ्यात 'यज्ञ' ही संकल्पना ह्या विश्वप्रश्नांच्या मुळाशी आहे, हे मांडले.

ह्या 'यज्ञक्रिया'चाच -वैश्विक यज्ञक्रियेचाच वापर करून मानवी मर्यादित, जन्मसिद्ध सामर्थ्य व शक्तीवर स्वतःच्या बौद्धिक साक्षात्कारी दृष्टीचे वर्धन कसे होऊं शकेल ह्याचसाठी शरीरातर्गत सुप्त कुंडलिनी, तीन स्पिरीच्यूअल (त्रेतानि) अग्नि, वीर्य, ओज, उर्ध्वरेत क्रिया, सुषुम्ना नाडीचा मार्ग, सहस्त्राचक्र व इतर ७ सूक्ष्म देहातील विश्वाशी नाते जोडणारी चक्रे शोधून त्यावर आधारलेल्या ज्ञानक्रिया, संस्कार क्रिया सांगितल्या.

ह्या सर्व अलौकिक प्रयत्नांचा अनादर करणे वा त्या बद्दल अनभिज्ञ रहाणे हा तर स्वतःच्याच भारतीय संस्कृतीचा अपमान करणे होय!!

तेव्हां ह्या लहानश्या लेखांत श्रीयंत्र, श्रीविद्या, सोमयाग, प्रवर्ग्य यज्ञ विधी, त्रेताग्नि, सोम रस, पवमान सूक्त, अस्यवामीय सूक्त वगैरे वगैरे आधारभूत क्रियांची रहस्ये सांगण्याचा मानस पूर्ण होणे शक्य झाले नाही.

दिशाच्या पुढील लेखात हा प्रयत्न जरूर करूया.

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, २ मजला,
सारस्वत बॅंकेजवळ,अग्यारी लेन, ठाणे - १
दूरध्वनी क्र. २५३६८४५०,
ई-मेल yrsane@eth.net

# अमेरिकेतील निसर्गाचा रंगोत्सव

अमेरिकेतील 'पानझड' पाहून मनात आलेले विचार लेखात काव्यात्म डूब घेऊन येतात. लेखातील चित्रेरंगीत आहेत, पण दिशात रंगीत चित्रे देता न आल्याने कृष्णधवल दिली आहेत. वाचकांनी चित्रांतील काव्य समजावून घ्यावं - संपादक

गळण्याआधीं सळसळुनी ही रंग उधळीती पाने
आग लागल्यागत राळांचा फाग खेळती रानें
ज्वालांचे जणूं लोळ झोंबती लाल पीत नारिंगी
पर्णांचा वर्णोत्सव येतो उसळ्या चंगीभंगी



जवळ जवळ १५/२० वर्षांपूर्वी कविवर्य बोरकरांच्या एका कवितेतील या ओळी जेंव्हा वाचल्या तेंव्हा बोरकर कोणत्यातरी रानांतील पानगळती विषयीं लिहीत आहेत हे कळलं होतं. पण लाल-पीत-नारिंगी अशा पर्णांचा वर्णोत्सव मात्र काहींसा गोंधळात टाकून गेला. बोरकर हे जसे प्रेमकवी तसेच निसर्गकवी म्हणूनही प्रसिद्ध. निसर्गाशी ते एव्हडे एकरूप झाले होते की त्यांच्या अखेरच्या आयुष्यांत त्यांच्या चाहत्याना उद्देशून म्हणाले, "आपण मजवर असेच प्रेम करत राहिलात तर खोडाला जशी पुन्हां पुन्हां पालवी फुटते तशी मी पुन्हा पुन्हा कविता करत राहीन." मात्र बोरकरांनी संपूर्ण आयुष्यभर जी काव्यरचना केली त्यांतून दर्शन होत, ते गोव्यातल्या निसर्गाचंच. जिथे बोरकर जन्मले, वाढले त्या गोव्यातल्या सृष्टीसौंदर्यावर त्यांनी अपरंपार प्रेम केलं. कुळागारातल्या माडा-पोफळीच्या वनात, तळ्याकांठच्या केवड्याच्या वनात, रतन आबोली आणि जाई-जुईच्या सांज मंद सुगंधात ते धुंद झाले. एकमेकांना बिलगटलेले डाळिंबीची लालचुटुक फुलं पाहून त्यांना आपल्या जिवणीची जिवणीशी झालेली भेट आठवली, पानाशिवाय फुललेल्या चाफ्याचं अप्रूप त्यांनी गायलं, आणि दूधसागराचं फसफसणारं पाणी पाहून त्यांना विराटाच्या हास्याची आणि त्या आवाजातून वेदघोषाची आठवण झाली होती. बोरकरांच्या काव्यातून ओसंडणारा हा सारा निसर्ग तर मला परिचित होता. मीही त्यांत रमलो होतो, पण मग ही वर्णनं कुठली?

त्यानंतर जवळ जवळ ५/७ वर्षांनी माझा मुलगा अमेरिकेस गेला आणि मग अचानक त्यानं एकदां पाठवलेल्या फोटोंत मला तो सृष्टीचा रंगोत्सव आढळला. काहीं झाडांची पानं सोनेरी पिवळी, कांहींची लाल भडक तर कांहींची नारिंगी आणि मग स्मृतिपटलावर पुन्हा एकदा बोरकरांच्या त्या काव्यपंक्ती उभ्या ठाकल्या. आणि मग माझं मन सृष्टीतील या अनोख्या मनोहारी बदलाच्या निरनिराळ्या मार्गांनी, निरनिराळ्या दिशांनी वेध घेऊ लागलं.

सर्वसाधारणपणे उन्हाळा संपून हिवाळा सुरु होण्यापूर्वीच्या, सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्याच्या कालखंडाला सारं पाश्चिमात्य जगत 'ऑटम्न' म्हणत मात्र उत्तर अमेरिकेत हा काळ 'फॉल सीझन' म्हणूनच सर्वमान्य आहे. तसा अमेरिकन लोकांचा सारु शब्दकोश

जगावेगळाच आहे. ज्याला सारं जग 'पेट्रोल' म्हणतं त्याला ते 'गॅस' म्हणतात. ज्याला आपण बॅटरी म्हणतो त्याला 'टॉर्च' म्हणणं आपण समजू शकतो. पण बॅटरीमध्ये जे आपण 'सेल' घालतो त्याला ते 'बॅटरी' म्हणतात. आणि आपण 'सेल' म्हटलं की त्यांच्या डोळ्यासमोर आपला 'मोबाईल फोन' येतो. असो, तर या फॉल सीझनमध्ये बहुसंख्य झाडांची पानं गळून पडतात. परंतु गळण्याआधी कांहींची पानं सोनेरी होतात. हिवाळा सुरु झाला की या भागांत सूर्यप्रकाशाची व्याप्ती आणि तीव्रता हळू हळू कमी होते. डिसेंबरच्या अखेरीस दिवस जेमतेम ६/७ तासांचा व रात्र १७/१८ तासांची होते. तपमान शून्याच्या आसपास रेंगाळत असतं. अधून मधून हिमवर्षावही होत असतो. अशा या वातावरणांत जी झाडं जगू शकत नाहीत ती मरतात. ओक जातींमधील व सूचिपर्णी जातींमधील वृक्ष हिमवर्षावाला तोंड देऊन ही दिमाखात उभे राहतात. मात्र बहुसंख्येने असणारे 'डेसिड्युअस' प्रकारांतील वृक्ष आपलं जीवन टिकवण्यासाठी वेगळाच मार्ग चोखाळतात.



वनस्पतींच्या पानांमध्ये असणाऱ्या हरित रंगद्रव्यामुळे पानांना हिरवा रंग प्राप्त होतो हे हरित रंगद्रव्य सूर्यप्रकाशामध्ये पाणी व हवेतील कार्बन-डाय-ऑक्साईड यांच्या सहाय्याने कार्बोहायड्रेटच्या रुपांत वनस्पतींचं अन्न तयार करतं. या प्रक्रियेमध्ये हे रंगद्रव्यही विघटन पावत. मात्र अन्ननिर्मितिची प्रक्रिया सतत चालू राहण्यासाठी वनस्पती हे रंगद्रव्यही सतत निर्माण करतात. फॉल सीझन सुरू झाला कीं दिवस लहान होऊ लागतो.  सूर्यप्रकाशाची व्याप्ती कमी होते. आणि त्यामुळे वनस्पतींचे अन्न निर्मितीचे कार्य मंदावू लागते. परिणामी हरितद्रव्यांचं उत्पादनही कमी होऊ लागतं. वनस्पती पानांच्या देठांमध्ये असणाऱ्या नलिकांमार्फत त्यांना पाण्याचा पुरवठा करतात व पानांनी निर्मिलेल अन्न त्याच नलिकांमधून शोषून घेऊन त्याचा गोदामध्ये साठा करतात. हवेतील बदलाची वनस्पतींना जाणीव झाली की प्रथम या देठाच्या मुळाशी 'कॉर्क सेल' तयार होऊ लागतात. नलिकांचा मार्ग बंद होतो. वनस्पतींना आता अंतरंगातलं बाष्प टिकवून ठेवायचं असतं. अन्ननिमित्तिची प्रक्रियाही बंद होणार असते. आणि म्हणून पानगळती अपरिआर्य ठरते. परंतु प्रत्यक्ष पानगळतीपूर्वी हरित रंगद्रव्याच्या अभावाने पानांचा हिरवा रंग नाहीसा होतो. व पानांमध्ये 'कॅरोटिनाईड' रंगकण उठाव घेतात आणि या रंगकणामुळे कांही पाने लाल, कांही पिवळी तर कांही नारिंगी दिसू लागतात. १०/१५ दिवसांतच ही सर्व पानं झडून जातात आणि झाडं जमिनीमध्ये रोवलेल्या काठ्यांसारखी दिसू लागतात. यानंतर ही झाडं आपली चार महिन्याची अज्ञातवासाची वेगणी करून



वाहातः हिमवर्षावाला तोंड देण्यास सज्ज होतात. सृष्टीच्या एका अनोख्या चमत्काराची शास्त्रीय दृष्टिकोनातून केलेली ही चिरफाड.

आता या ठिकाणी एक प्रश्न निर्माण होतो कीं दृष्टिकोन शास्त्रीय असल्यावर आणि सारी चिकित्साही शास्त्रीय पद्धतीनं केल्यावर या नैसर्गिक घटनेला चमत्कार म्हणून संबोधणे कितपत योग्य ठरते? शास्त्रीय दृष्टिकोनातून केलेली चिकित्सा, आपले इन्द्रियजन्य ज्ञान व त्या ज्ञानाच्या सहाय्याने केलेले काही प्रयोग यातून आलेले प्रत्यक्ष अनुभव आपणासमोर ठेवत असते. उदाहरणार्थ, या ठिकाणीं पानांना हिरवा रंग कोणत्या द्रव्यामुळे प्राप्त होतो व त्याच्या अभावानें इतर रंगद्रव्ये कसा उठाव घेतात हे समजते तसेंच विशिष्ट हवामानात कॉर्कसेल तयार होऊन पानांची अन्ननलिका बंद होते आणि अन्ननिर्मितीची प्रक्रियाच बंद पडल्यामुळे पानगळती सुरू होते हे समजते. परंतु मुळांत विशिष्ट हवामानात कॉर्कसेल तयार होण्याची प्रेरणा कशी व कोठून मिळते? सूर्यकिरणांची व्याप्ती कशी झाल्यावर हरित द्रव्यांचे उत्पादन कमी करण्याची व्यवस्था कशी निर्माण होते? या आणि अशा कांहीं प्रश्नांची उत्तरं शास्त्राच्या इन्द्रियजन्य आणि प्रयोगसिद्ध ज्ञानाच्या कक्षेपलीकडे आहेत आणि म्हणून सर्वसामान्य दृष्टीला आणि मनाला हा चमत्कार वाटू शकतो.

पण बोरकरांसारख्या कविमनाला या चमत्कारातून काय आणवलं? कोणत्या चिरंतन सत्याचं दर्शन झाल? पानगळती म्हणजे त्या पानांच्या जीवनाचा शेवट. हिवाळ्याची चाहूल लागताच त्या पानांना समोर उभा ठाकलेला आपला मृत्यू स्पष्ट दिसत होता. आणि तरीही अत्यंत शांत चित्तानं ती पान विविध रंगांची उधळण करून हा रंगोत्सव साजरा करत होती. आणि म्हणून बोरकर त्या कवितेंत पुढे म्हणतात-

''झडण्याची चाहूल लागता असा महोत्सव त्यांचा,

सम गणुनी पिटितात चौघडा येणाऱ्या मरणाचा''

भारतीय संस्कृतीत मृत्यूची भीषणता नाही. साने गुरुजी तर म्हणत, 'मृत्यू हे जीवनवृक्षाला आलेलं एक गोड फळ आहे'' मृत्यूचे काव्य या सुंदर लेखांत गुरुजींनी कबीराची एक रचना सांगितली आहे-

'कर ले सिंगार चतुर अलबेली-

साजनके घर जाना होगा''

किती सुंदर भाव हा योगाचा वियोग पण जगदीश्वराशी योग. मरण म्हणजे जणू कांही जीर्ण झालेले शरीररुपी वस्त्र टाकून देऊन पुन्हा नवीन देह धारण करण्याची तयारी करणं असं मानणाऱ्या भारतीय संस्कृतीनं मरणाला हो किती सुंदर, मधुर बनवून टाकलं आहे. मात्र आधुनिक काळांतील महर्षी महायोगी श्री अरविंद मृत्यूची मीमांसा करताना म्हणतात,

''मृत्यूला स्वतंत्र, स्वाभाविक अस्तित्व नाही. जीवनाला मदत करण्याच्या हेतूनेच तो अस्तित्वात आहे. Death is necessary, not as a devial of Life, but as a process of Life. मृत्यू ही जीवनाची एक कार्यपद्धती आहे, प्रगतीचा एक टप्पा आहे. या ठिकाणी एक मुद्दा समजून घ्यायला हवा की श्री अरविंदाच्या मते जीवन म्हणजे जडत्वापासून सुरु झालेला आणि अंनतापर्यंत चालणारा प्रवास. ७०/८० वर्षाच्या एका जीवनात हा प्रवास कसा पूर्ण होणार? आत्म्याला पुनः पुनः जन्म घेऊन, विविध प्रकारचे अनुभव घेत मार्गक्रमा करणे क्रमप्राप्त आहे. ८० वर्ष झाल्यावर इन्द्रियांची शक्ती क्षीण होऊ लागते. माणसाचं अस्तित्व वनस्पतीच्या पातळीला जाऊ लागतं. पुन्हा एकदा नव्या शरीरात, नव्या जोमानं जीवनाचा वेगवेगळा अनुभव घेत वाटचाल चालू राहते. बाह्य रंग-रूप-आकार यामध्ये होणारा बदल हेच अमरत्व, याचीच अपेक्षा प्रत्येक सजीवानं धरायची हाच भारतीय संस्कृतीच्या विचारधारेचा संदेश, आणि म्हणून याच भारतीय संस्कृतीचा

प्रभाव असणाऱ्या बोरकरांना फॉल सीझनमधील निसर्गाच्या या चमत्कारांत जन्म-जीवन-मृत्यू-पुन्हां जन्म या चक्रनेमिक्रमाच्या चिरंतन सत्याचं दर्शन घडलं. पानगळती म्हणजे मृत्यू. पण वसंत ऋतु आला की या झाडांना पुन्हा नवी पालवी फुटते. नव्या जोमानं नव्या जीवनाची पुन्हा सुरुवात होते. चिरंतन सत्याची जाणीव असल्यामुळेंच ही आपल्या मृत्यूला आनंदात सामोरी जात असावीत. या विचारानं बोरकरांना वनस्पतीसृष्टीच्या हा व्यवहार आदर्श, अनुकरणीय वाटला. आणि म्हणून कवितेची अखेर करताना ते म्हणतात-

"मीही जाहलो उत्सुक त्यांसह अर्पण होण्यासाठीं"

बोरकरांना जीवनाची जबरदस्त ओढ होती. परंतु संतवाङ्मयाच्या अभ्यासानं आणि त्यावर केलेल्या तात्विक चिंतनातून, मृत्यूची अपरिहार्यताही त्यांनी गांभीर्याने सहज स्वीकारली होती. या दोन जाणीवांचा संघर्ष, मृत्यूच्या अटळतेने जाणवणारे, नैराश्य. मृत्यूचे भय, आणि त्यांतून निर्माण होणारी अस्वस्थता त्यांच्या कवितेत आढळत नाही. आणि म्हणूनच मृत्यूला 'परमसखा' मानणारे बोरकर.

'विझवून दीप सारे मी चाललो निजाया' असे सहजपणे म्हणू शकतात. फारतर परमेश्वावर असणाऱ्या नितांत श्रद्धेनं त्याची प्रार्थना करतात-

'जळण्याचे बळ तूच दिले रे, दे आतां विझण्याचे'

बोरकरांनी संपूर्ण विचारधारा ही भारतीय संस्कृतीमधील मूलभूत विचारांनी प्रभावीत झालेली असल्यामुळेच त्यांना अमेरिकेतील 'फॉल सीझन' मधील या सृष्टीच्या चमत्कारात जगावेगळा आशव जाणवला. हे इतर अमेरिकन लेखक अथवा कवींच्या रचना वाचल्यावर आपल्याला प्रकर्षाने जाणवते.

सृष्टी सौंदर्याचं हे मनोहारी रुप पाहण्यासाठीं अमेरिकेच्या दक्षिण भागांतून हजारो पर्यटक या कालावधीत मुद्दाम उत्तरेकडे येतात. विशेषतः इकडच्या डोंगराळ भागांतून फेरफटका मारला तर लाल पीत, नारिंगी रंगाची झूल पांघरलेल्या डोंगरांचं सौंदर्य अवर्णनीय असतं. सृष्टीच्या या सुंदर बगीचातून चालू असणारी रंगाची उधळण पाहून प्रसन्न झालेला आल्बर्ट कॅमस हा लेखक म्हणतो-

"Autumn is a second Spring

When every leaf is a flower"

मात्र असं मनोहारी दृष्य बोरकरांसारखा एखादा उच्च जाणीवेचा प्रतिभावंत कवी जेव्हां पाहतो तेव्हां त्याच्या आंतरमनात एक वेगळीच सुंदर प्रतिमा निर्माण होते. त्या सुंदर प्रतिमेना त्या कवीच्या अंतरात्मा आनंदानं उचंबळून येतो. आणि मग तो आनंद सर्वांना वाटण्यासाठी त्याची प्रतिभाशक्ती एखादं सुंदर काव्य निर्माण करते.

आपण जेव्हा ते काव्य वाचतो, आपल्या अनुभवसिद्ध बुद्धीनं जाणून घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपल्यालाही आंतरमनात तीच प्रतिमा उमटली तर आणि तरच आपलाही अंतरात्मा त्याच आनंदात नाचू लागतो.

माझ्या सुदैवाने गेल्या पाच वर्षांत हे सृष्टीसौंदर्य मला दोनदा पाहता आलं. पण प्रत्येक वेळीं ते दृश्य पाहताना मला बोरकरांच्या कवितेची आठवण होत होती. त्या दिव्य विचारांची प्रतिमा माझ्या आंतरमनावर उमटत होती. आणि अंतरात्म्याला होणाऱ्या आनंदाचा आस्वाद घेतल्यावर स्पष्टपणे जाणवत होतं कीं त्या आनंदाची जातकुळी दृष्टीसुखाच्या आनंदापेक्षाही काहीं वेगळीच असते.

**नरेंद्र नाडकर्णी**

सीडी-१०१, सी-१,
श्रीरंग सोसायटी, ठाणे
Email-nd_nadkarni@yahoo.com

# संत पुरंदरदा एक महान भगवद्भक्त

*दक्षिणेतील महान संत व भक्तिपंथाचे प्रचारक पुरंदरदास याच्या रचना तुकाराम महाराजां प्रमाणेच जीवनदर्शी आहेत. त्या श्री परिंदरदासांचा हा परिचय- संपादक*

'संत आनंदाचे स्थळ। संत सुखचि केवळ।
नाना संतोषाचे मूळ। ते हे संत।'

जगात संतांपाशीच आनंद राहतो. संतांमध्ये संतोषाचा उगम होतो. संतांवाचून कोणासही पूर्ण विश्रांती लाभत नाही. त्यांचे जीवन कृतकृत्य जीवन आहे. असाच संतसंग आहे. कर्नाटकातील थोर संतकवी पुरंदरदास यांचाही आहे. अशा संतकथांमधूनच ईश्वरदर्शनाची वाट सापडते. ईश्वरासंबंधी अनुभवांच्या श्रीमंतीमध्ये गर्भश्रीमंत संत पुरंदरदासांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या अनुभवांचे संकलन साधकांना साधनाच्या वाटचालीत विशेष उपयोगी ठरणार आहे. जीवनामध्ये सत्कर्म घडल्याचे समाधान प्राप्त होण्यासाठी आपण संत पुरंदरदासांच्या आशीर्वादाचे फळ अनुभवू या.

**जन्म हेच मुळी नवसाचे फळ:**

संत पुरंदरदासांचे वडील वरदप्पा नायक रत्नांचे व्यापारी होते. आईचे नाव लक्ष्मी अहाडा. नावाप्रमाणेच त्या साक्षात् लक्ष्मी होत्या. श्रीवेंकपतींची (श्रीनिवासाची) बारा वर्षांची उपासना फळाला आली आणि पुत्रप्राप्ती झाली. प्रसाद म्हणून मुलाचे नाव श्रीनिवास व तिम्मप्पा ठेवले. वडिलांची धार्मिक आणि सात्त्विक वृत्तीच त्यांच्या संतत्वाला कारणीभूत ठरली.

**व्यापारी वृत्तीचा परीणाम -**

पुरंदरदासांना सुंदर, सुस्वभावी व सात्त्विक पत्नीची साथ लाभली. भरपूर पैसा आणि प्रेमळ आईवडिल एकूणच श्रीनिवासजवळ सगळी सुखे हात जोडून उभी होती.

तिम्मप्पाचे वयाच्या सोळाव्या वर्षी सरस्वती नावाच्या सुशील मुलीशी लग्न झाले आणि प्रपंचाचा श्रीगणेशा झाला. चार पुत्र आणि एक कन्या असा त्यांचा संपन्न परिवार होता.

वडिलांच्या मृत्यूनंतर तिम्मप्पांनी पिढीजात सराफीचा, रत्नपारखीचा व्यवसाय स्वतःच्या बुद्धिकौशल्याने खूप वाढवला. कुशल रत्नपारखी म्हणून त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली. एवढेच नव्हे तर, विजयनगर सम्राट कृष्णदेवराय याच्या दरबारात त्यांना फार मान होता. लवकरच तिम्मपा नवकोट नारायण झाले.

एवढे धनाढ्य असूनही तिम्मप्पा कृपण होते. दारी आलेल्या भिक्षेकऱ्याला मूठभर धान्य किंवा एक पैसा देणे त्यांच्या जीवावर येई. उलट त्यांची पत्नी मात्र अत्यंत उदार आणि दयाळू होती. सरस्वतीला त्यांचा कंजुसपणा मुळीच पसंत नसे.

त्यांच्या दातृत्वाची परीक्षा प्रत्यक्ष पांडुरंगानेच वृद्ध व गरीब ब्राह्मणाचे रूप घेऊन केली. परंतु लोभी तिम्मप्पाने त्याला काहीच दिले नाही. तेव्हा त्या वृद्ध ब्राह्मणाने सरस्वतीकडे मदत मागितली. तिने दयाळू अंतःकरणाने आपली नथ दिली. पण सरस्वती खूप घाबरली. विषप्राशन करू लागली, तेव्हा मात्र ती भगवंताच्या कसोटीस उतरल्याने पांडुरंगाने ती नथ विषाच्या पेल्यातच ठेवली. या चमत्काराने तिम्मप्पाचे डोळे उघडले. काळांतराने धनलोभी तिम्मप्पा त्यागी व विरक्त बनला. परमेश्वराला न ओळखल्याने त्यांनी आपल्या संपत्तीचा धिक्कार केला. कृपणपणाचा राग आला. पश्चातापाने त्यांची एकदम वृत्तीच पालटली. मग त्यांनी गोरगरिब, दरिद्रि, याचक यांना

बोलावून आणून आपली सर्व संपत्ती त्यांना दान देऊन टाकली. सर्वस्वाचा त्याग केला, द्रव्यप्रेमाचे ईश्वरप्रेमात रूपांतर झाले. दुसऱ्या दिवसापासून त्यांनी भिक्षेची झोळी खांद्याला लावली.

**श्रेष्ठ हरदास -**

आता तिम्मप्पा ईश्वर चिंतनात रंगून गेले. विषयासक्तीपासून ते दूर गेले. परमेश्वर कृपेचा आधार शोधू लागले. द्रव्यावरील प्रेमाचे रूपांतर ईश्वरप्रेमात झाले. जे होते ते भल्याकरताच होते असे ते म्हणू लागले.

उच्च कोटीची भक्ती व तत्त्वज्ञान यातून निर्माण होणारे जीवनविषयीचे ज्ञान त्यांनी आपल्या काव्यात इतके ओतले की त्यांना 'पुरंदरोपनिषद' म्हणण्यात येऊ लागले.

जमीनजुमला, धनदौलत व कामिनी हे आणि यापासून निर्माण होणारे मोहजाल सर्व दुखाःच्या मुळाशी आहेत असे ते मानीत. धर्माबाबतच्या दांभिकपणाचा ते अत्यंत कडक शब्दात धिक्कार करू लागले.

जग दुःखाने भरलेले असेल तरी त्यातून निघून जाणे हा काही उपाय नाही. तो केवळ पळपुटेपणा आणि भित्रेपणा आहे. जीवनातील प्रश्नांना तोंड दिले पाहिजे. जगात राहूनही अलिप्तपणे राहण्यास शिकले पाहिजे. नरजन्म ही एक विशेष देणगी व अमूल्य संधी असून ती आपण वाया घालवता कामा नये असा त्यांचा उपदेश आहे. शेवटी न्यायाचाच जय होईल, असा त्यांचा दृढ विश्वास आहे. परमेश्वर सर्वकर्ता आहे असे मानण्यास शिकले, तर मनुष्याच्या सर्व चिंता दूर होतील असे ते खात्रीने सांगत.

**तत्त्वज्ञानः-**

पुरंदरदासांच्या काव्याच्या अभ्यासावरून त्यांनी दिलेल्या ईश्वराच्या स्वरूपाबद्दल तीन टप्पे दृष्टीस पडतात १) सगुण अवस्था २) सगुण-निर्गुण अवस्था ३) निर्गुण अवस्था.

ब्रह्म दिसतही नाही व अदृश्यही होत नाही. ते अनादी अनंत आहे. ते अग्राह्य व ज्ञानाच्या टप्प्याच्यापलीकडे आहे. परमेश्वर म्हणजे स्वायत्त वस्तू आहे. तो अप्राकृत आहे.

पुरंदरदासांनी सांगितलेला आणखी एक विशेष म्हणजे चर्मचक्षूने आपणास ईश्वराचे दर्शन होत नसून चित्तचक्षूने होते. यालाच परमेश्वराचे अतींद्रिय दर्शन म्हणतात. पुरंदास बुद्धिवादी असून ते जातीयवादाच्या पलीकडे जातात. ब्रह्माचा साक्षात्कार ज्याला झाला आहे तो ब्राह्मण अशी ब्राह्मण शब्दाची त्यांनी व्याख्या केली आहे.

**संगीतज्ज्ञ - आदिगुरु**

तिम्मप्पांनी संस्कृत, कन्नड, संगीत या विषयात शास्त्रोक्त ज्ञान संपादन केले. ते जसे महान भगवद्भक्त होते तसेच मोठे संगीतज्ज्ञही होते. कर्नाटक संगीतात पितामह म्हणून त्यांना गौरविले जाते. कर्नाटक संगीत शिकण्यासाठी त्यांनी संगीताचे पाठ तयार केले म्हणून त्यांना 'आदिगुरू' मानतात. कर्नाटक संगीताचे प्रमुख प्रवर्तक त्यागराज, मुथ्थुस्वामी दीक्षित आणि श्यामशास्त्री यांना संत पुरंदरापासूनच प्रेरणा मिळाली. त्यांच्या काळापासून 'मायामालवगौळ' हा राग अभ्यासकांना प्रारंभी शिकवला जाऊ लागला.

त्यांनी रचलेले 'कीर्तन' 'सुळादी' आणि 'उगाभोग' हे काव्यप्रकार प्रसिद्ध आहेत. संस्कृत काव्यरचना करण्याची परंपरा मोडून त्यांनी देश भाषेत, कानडी भाषेत 'देवरनाम' नामक भक्तिरचना केल्या. त्यांनी सुमारे ४,७५,००० पदे त्यांनी रचली असावीत असे मानले जाते. त्यापैकी काही हजार पदेच उपलब्ध आहेत. दक्षिण भारतात सर्वत्र गायल्या जाणाऱ्या त्यांच्या पदांमध्ये पुरंदर विठ्ठल असे नाव असते. संत ज्ञानदेव, संत तुकाराम यासारख्या संतांनी ज्याप्रमाणे महाराष्ट्रात वैष्णव धर्माचा प्रचार केला. त्याप्रमाणे

पुरंदरदासांनी दक्षिणेत विशेषतः कर्नाटकात भक्तिपंथास लोकप्रियता मिळवून दिली.

दासपंथाचे संस्थापक श्रीपादराव यांचे एक महत्व शिष्य व्यासराव यांनी त्यांना माध्व वैष्णव पंथाची दीक्षा दिली. आणि 'पुरंदर विठ्ठल' असे त्यांचे नाव ठेवले. पण पुरंदर गडावर जन्म झाला म्हणून व्यवहारात मात्र 'पुरंदरदास' नाव प्रचारात राहिले.

भक्तिचा मळा फुलवला -

स्वप्नातील पांडुरंगाच्या दृष्टांताप्रमाणे पुरंदरदास विजयनगरला राहू लागले. तेथील वास्तव्यात नगरात फिरून आपल्या सुरेल व गोड आवाजात भक्तिगीते गाऊन भिक्षा गोळा करीत. त्यांची मूलेही त्यांना साथ देत. सारीच पदे रसाळ व हृदयस्पर्शी असल्यामुळे ती लोकप्रिय झाली. कर्नाटकभर संत पुरंदरदासांची कवित्व कीर्ती पोहोचली. कीर्ती सर्वदूर पसरली. परिणामी कृष्णदेवरायही त्यांचा भक्त बनला. त्यांनी तिरुपती येथील देवालयात पुरंदरदासासाठी एक वेगळा मंडप बांधून दिला. आजही तो मंडप 'दासरमंडप' म्हणून प्रसिद्ध आहे.

केल्याने तीर्थाटन -

नाना तीर्थां क्षेत्रांस जावें। तेथें त्या देवांचे पूजन करावें।

नाना उपचारी अर्चावें। परमेश्वरासी॥

संत पुरंदरदासांनी संपूर्ण भारताची तीर्थयात्रा करून सर्व तीर्थक्षेत्रात काही काल वास्तव्य केले. आणि तिथल्या निरनिराळ्या देवतांवर पदे रचली. पंढरपूर क्षेत्रातही त्यांनी दीर्घकाळ वास्तव्य केले. तिथे असताना त्यांच्यावर एक अत्यंत दुर्धर प्रसंग ओढवला.

एक नर्तकी पंढरपुरातील विठ्ठलाची एकनिष्ठ भक्त होती. प्रत्यक्ष विठ्ठलाने संत पुरंदरदासाचे रूप घेऊन तिचे नृत्यगायन ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. तिनेही अत्यंत भक्तिभावाने ती इच्छा पूर्ण केली. त्यामुळे प्रसन्न होऊन देवाने आपल्या हातातले एक अमोल कंकण तिला दिले.

दुसऱ्या दिवशी पूजेच्या वेळी पांडुरंगाचे कंकण एका हातात नाही हे पुजाऱ्यांना कळले. शोधाशोध सुरू झाली. शेवटी ते कंकण त्या नर्तकीजवळ सापडते. तिने ते पुरंदरदासाने दिल्याची ग्वाही दिली. त्वरितच संत पुरंदरदासांना पकडून आणले आणि देवळातच खांबाला बांधून यथेच्छ झोडपले. इतक्यात गाभाऱ्यातून देववाणी ऐकू आली.

"मीच पुरंदरदासाच्या वेषात जाऊन कंकण दासीला दिले. तेव्हा त्याला सोडा व त्याला ज्या खांबाला बांधले त्याची पूजा करा." पुजाऱ्यांनी संत पुरंदरदासाला सोडले व त्यांची माफी मागितली. त्यांची मूर्ती त्या स्तंभावर कोरली तो स्तंभ 'दासस्तंभ' म्हणून आजही प्रसिद्ध आहे. भक्तजन पांडुरंगाच्या गाभाऱ्यात जाण्यापूर्वी प्रथम त्याला वंदन करतात. त्यालाच 'गरुडस्तंभ' म्हणतात.

ज्ञानमार्गाचे विवेचन -

भक्तीचा महिमा गातांना ते म्हणतात, भक्ती हेच संसारातले परम भाग्य होय. गुरुंचे स्मरण हेच परमसुख होय. भगवंताचे स्मरण करायला विसरू नये. त्या श्रीहरीच्या प्राप्तीसाठी यज्ञयाग, संन्यास यांची आवश्यकता नाही. केवळ नामस्म रणाने सर्व पापे नष्ट होतील.

संत तुकारामांप्रमाणेच पुरंदरदास हे बहुश्रुत व व्यवहारी होते. त्यांच्या पदात सखोल ज्ञान व विविध अनुभव व्यक्त झाले आहेत. पाखंड अंधश्रद्धा, ढोंगीपणा, बाह्यावंडबर, जातिभेद यांचा त्यांनी स्पष्ट व कठोर शब्दात निषेध केला, अस्पृश्यांबद्दल त्यांना फार कळवळा होता. त्यांच्या मते जो खोट बोलतो, जो उधारी बुडवतो, जो निर्लज्ज जीवन जगतो तोच खरा अस्पृश्य होय.

**आत्मशुद्धीचा खरा मार्ग कोणता -**

स्नान माडिर ज्ञान तीर्थदाडि।

नानुनीने अहंकार बिट्टु॥

वेदशास्त्र गळ नोदिदवंदु स्नान।

भेदाभेद तिळिदरोंदु स्नान॥

साधु सज्जनर संग ओंदु स्नान।

पुरंदर विठ्ठल ध्यान वे स्नान॥

म्हणजे आपपर भाव सोडून ज्ञानरूपी तीर्थात स्नान करा. वेदशास्त्रांचे अध्ययन करणे, भेदात अभेद जाणणे, सज्जनांचा सहवास व श्रीहरीचे ध्यान करणे हेच खरे तीर्थस्नान होय तीच खरी आत्मशुद्धी.

भक्तिगीतांव्यतिरिक्त पुरंदरदासांनी द्रौपदीवस्त्राहरण, सुदामचरित्र, परतत्त्वसार ही काव्ये रचली आहेत पण ती अजुनही अप्रकाशित आहेत.

विष्णुभक्त असले तरी त्यांनी शिवाची किंवा अन्य देवतांची निंदा केली नाही. त्यांनी आपल्या पदात शिव, पार्वती, गणेश यांनाही श्रद्धपूर्वक वंदन केले आहे. इतर देवतांच्या भक्तांविषयी त्यांना प्रेम वाटे. त्यांच्या दृष्टीने सर्व उपासनापद्धती समान आहेत. कारण एकाच परमात्म्याची प्राप्ती हे त्या सर्वांचे उद्दिष्ट आहे.

संत पुरंदरदास आणि त्यांचे शिष्य ह्यांनी प्राकृत भाषेत भक्ती सांगितली आणि आपली परंपरा सुरू केली हरिदासांच्या या परंपरेला 'दासकूट' असे म्हणतात. मध्वाचार्यांच्या व्दैत मताला अनुसरूनच हरिदासांनी भक्तीचे तत्वज्ञान सांगितले आहे.

**भाषाप्रभु पुरंदरदास -**

संस्कृतनिष्ठ असली तरी संत पुरंदरदासांची भाषा जड व क्लिष्ट नाही. ती सुबोध, प्रवाही आहे. त्यांच्या काव्यात विविध अलंकार, म्हणी व वाक्यप्रचारांचा पुष्कळच चपखल उपयोग दिसून येतो. त्यामुळे त्यांची पदे रसाळ आणि मधुर आहेत. त्यात प्रासादिकताही आहे. आजही कर्नाटकातील लोक त्यांची पदे व भजने आवडीने गातात. त्यांचे एक मधुर कानडी पद पहा-

''सुलभ पूजि केलि सूक्ष्म जनरू'

म्हणजे - ''सुलभ करा हे श्री हरि पूजन

ज्यात न वेचे किमपि हो धन''

यातच खरी जन्माची सार्थकता आहे.

सौ. उषा जयंत कळमकर

(प्रभारी मुख्या.)

डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे.

फोनः (२४०८९१४)

**दिशा**

**वर्गणीसाठी संपर्क:**

**विद्या प्रसारक मंडळ**

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर,**

**नौपाडा, ठाणे-४०० ६०२**

**दूरध्वनी २५४२६२७०**

# पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास

सायंतारा २००६-२००७ या स्वामी विवेकानंद कला वाणिज्य रात्र महाविद्यालयच्या वार्षिकाकडून साभार-संपादक

कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्याच्या बंधनात रहावयास आनंद वाटेल का? पशु-पक्षीसुद्धा कोणतेही बंधन सहन करीत नाहीत. पिंजऱ्यात बंद केलेल्या पोपटालासुद्धा मोका मिळताच आपले पंख पसरून आकाशात स्वच्छंद विहार करावयास निघतो. 'पराधीनतेमध्ये कदापि सुख नाही' या उक्तीनुसार व्यक्ती आणि समाजाची सुद्धा स्वतंत्रपणे राहण्याचीच इच्छा असते. एका संस्कृत सुभाषितांमध्ये असे म्हटले आहे की शिव शंकराच्या जटेमध्ये असणारा चंद्रसुद्धा कष्टाने कधी कमी तर कधी वाढत असतो. कारण की तो त्या जटाधारी शंकराच्या बंधनामध्ये आहे. बंधनमुक्त आणि स्वतंत्रपणे राहण्याची उत्कट अभिलाषा आपल्या देशात स्वातंत्र्यासाठी महासंग्राम झाला. इंग्रज शासनाविरुद्ध संपूर्ण देशात घडलेला हा पहिला सामूहिक महाअभियान होता.

भारतीय इतिहास आणि भारतीय राष्ट्रजीवनाच्या या पर्वाची म्हणजेच पहिल्या स्वातंत्र्य संग्रामासंबंधी अनेक प्रकारचे दुष्प्रचार इंग्रजांनी योजनाबद्ध पद्धतीने, स्वतःला हवे त्या पद्धतीने केली की अजूनही आपल्याच मंडळींच्या मनात पूर्णपणे घर करून बसली आहे. यासंदर्भात खालील गोष्टी इंग्रजांनी ठासून सांगावयास सुरुवात केली.

१) हा मूठभर शिपायांनी केलेला उठाव होता, सामान्य जनतेचा यात सहभाग नव्हता.

२) हा विद्रोह आकस्मितपणे आणि कोणत्याही योजनेनुसार घडलेला नव्हता.

३) केवळ चरबीवाल्या काडतुसांच्याबाबत घडलेली ही एक सामान्य घटना होती.

४) हा विद्रोह केवळ उत्तर भारतातल्या काही भागांत घडविण्यात आला.

५) काही राजेमंडळींचे राज्य इंग्रजांनी बरखास्त केल्याने असंतुष्ट अशा मंडळींनी घडवून आणलेला हा कट होता.

६) नानासाहेब पेशवे, अजीमुल्ला खान इत्यादी चरित्रहीन व्यक्ती या कटात सामील होत्या.

७) भारतातील मुस्लिम शासक पुन्हा सत्ता आपल्या हाती घेण्यासाठी या उठावात सामील होते.

१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामातबाबत इंग्रजांनी वरील प्रकार केला. भारतीय राष्ट्रीयत्वाची भावना सर्वसामान्य जनतेत निर्माण होऊ नये म्हणून हा उठाव काही माथेफिरू शिपायांनी केला होता असा प्रचार करण्यास सुरुवात केली आणि या महासंग्रामाच्या महानायकांना चरित्रहीन बनविण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात आपण असा विचार केला की इंग्रजांचे असे म्हणणे ठीक होते की स्वातंत्र्यसंग्रामाचा हा प्रयत्न म्हणजे एक मामुली घटना होती. परंतु इंग्रजी शिक्षण पद्धतीत तयार झालेले आपलेच स्वकीय विद्वान आणि इतिहासकार म्हणवून घेणारी मंडळीही इंग्रजांच्या सुरात सूर मिसळून हा शिपायांनी केलेला उठाव होता असे म्हणू लागली याबद्दलच खेद वाटतो. विख्यात इतिहासकार डॉ. रमेशचंद्र मुजुमदार आणि डॉ. एस. एस. सेन इ. मंडळीही इंग्रजांनी रचलेल्या षडयंत्रात सामील होऊन त्यांच्याप्रमाणेच लिखाण करू लागली. १८५७ ला प्रथम स्वातंत्र्यसंग्रामाच्या शताब्दीबाबत त्यावेळेच्या केंद्र सरकारने डॉ. एस. एस. सेन यांना लिखाण करण्यास सुचविले असता त्यांनी या महान संग्रामाची व्यापकता, योजकता आणि महान उद्देश यांबाबत उदासिनता

दाखविली.

बाबतीत आपले राष्ट्र आणि आपला इतिहास आपल्याला हेच सांगेल की या महान स्वातंत्र्य संग्रामाची माहिती अत्यंत कष्टपूर्ण आणि प्रत्यक्षात इंग्रज शासन काळात ज्यांनी लिहीली आणि सर्व जगासमोर या स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास ज्यांनी पहिल्यांदा ठेवला त्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांना आपण विसरणार का? १० मे १९०७ रोजी म्हणजे वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. परंतु त्याच्या प्रकाशनापूर्वीच इंग्रजांनी या ग्रंथावर बंदी घातली. तरीसुद्धा या ग्रंथाचे हस्तलिखित जर्मनी, इटली, युरोप आणि फ्रान्स इत्यादी देशांमध्ये जाऊन पोहोचले. हा ग्रंथ म्हणजे त्यावेळी क्रांतीकारकांची गीताच समजले जात होते. या ग्रंथामध्ये त्यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमराची सविस्तर माहिती लिहिली आहे. प्रत्येक भारतीयाने हा ग्रंथ वाचलाच पाहिजे, म्हणजे या स्वातंत्र्यसमराची व्याप्ती, त्याची योजना आणि त्यासाठी केलेले प्रयत्न याची इत्थंभूत माहिती मिळू शकेल.

१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाची बीजे ही इंग्रजांनी केलेल्या प्लासीच्या लढाईपासूनच रोवली गेलेली आहेत याचा प्रत्यय आपणास येईल. सन १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजांनी आपली शासन व्यवस्था या देशावर लादण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात इंग्रजांना जसे पाहिजे तसे त्यांनी घडविण्यासाठी कोणताही मार्ग वापरायचे ठरविले आणि त्यासाठी त्यांना हवे तसे कायदे त्यांनी तयार करून घेतले. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर असंख्य गोष्टी सांगता येतील त्यावेळच्या अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी आपल्या रोजनिशीमध्ये त्याच्या नोंदी केलेल्या आढळतात.

### स्वधर्म व उपदेश

सर्वात पहिले इंग्रजांच्या लक्षात आले की अन्य देशांपेक्षा या भारताची सांस्कृतिक परंपरा एकदम पक्की आहे. स्वधर्म आणि स्वदेश यासंबंधी प्रत्येक भारतीयाच्या मनात उच्चकोटीचे भाव आहेत. ते भाव पुसण्यासाठी किंवा सांस्कृतिक ध्येयवाद संपविण्यासाठी त्यांनी पहिला कायदा इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये सन १८१३ साली केला तो म्हणजे या देशात ख्रिश्चन पाद्री आपल्या धर्माचा प्रसार मुक्तपणे करू शकतात. त्यामूळे १८५० पर्यंत या देशात प्रमुख २६० स्थानी ख्रिश्चन पाद्रयांनी आपले अड्डे निर्माण केले. त्यांचा प्रमुख उद्देश हा धर्मांतर हाच होता. जवळजवळ एक हजार पाद्री या मोहिमेत उतरले याची इतिहासात नोंद आहे.

इंग्रजांनी उभारलेल्या सैन्यदलात येथील स्थानिक भारतीय फार मोठ्या संख्येने असल्याने पहिल्यांदा सैन्यातील भारतीयांचे इसाईकरणाची सुरुवात मोठ्या प्रमाणात सुरु झाली. सेनेतील अनेक इंग्रज अधिकारी यात सामिल होते. प्रमुख इंग्रज अधिकारी आपल्या बंगल्यावर बोलावून अनेक शिपायांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देत असत. कर्नल व्हिलर आणि मेजर एडवर्ड यांची नावे प्रामुख्याने देता येतील. सैन्यातील छावण्यांमध्ये पाद्रया मुक्तपणे वावर असे आणि अनेक साहित्यांचे वाटप ते करीत असत. इसाई होणाऱ्या शिपायांना बढतीची तसेच अधिकारी पदाची लालूच दाखविली जात असे. पाद्रींच्या या हस्तक्षेपामुळे जनसामान्यांत असंतोष खदखदू लागला. त्यातच इंग्रजांनी कायदा करून मंदिर व मशिदींवर कर लावले. या विरोधात सर्वसामान्य जनता पेटून उठली. १७५७ नंतर प्रत्येक दिवशी देशात कुठे ना कुठे इंग्रज शासनाविरुद्ध आंदोलन हे होत होते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट इंग्रजांनी मुद्दाम घडवून आणली ती आपणा सर्वांना माहित आहे ती म्हणजे बंदुकींच्या काडतुसांना गाईची आणि डुकराची लावलेली चरबी.

दुसरे एक महत्वाचे कारण म्हणजे येथील जनता आपल्या राज्याला देव मानीत असे. इंग्रजांनी आपल्या कुटनीतीच्या बळावर येथील अनेक राज्यांना आपले मांडलिक बनविले किंवा जबरदस्तीने आपले मांडलिकत्व

पत्करायला भाग पाडले. जे राजे त्यांना जुमानत नव्हते त्यांची राज्ये विशेष कायदे तयार करून खालसा करण्यात आली. अनेक राजांची वारदाहक्काने झालेली नेमणूकच रद्द करण्यात आली. राजाने दत्तक घेतलेल्या मुलास वारदाहक्क मिळणार नाही अशी कायद्याची तजविज केली जेणेकरुण सर्व राज्यकारभार आपल्या मुठीत राहील. राज्य हडप करण्याची ही चाल पद्धतशीरपणे राबविण्यात आली. अत्यंत हीन प्रवृत्तीने अनेक संस्थाने इंग्रजांनी खालसा केली.

### वेगवान संदेश यंत्रणा

स्वाभाविकपणे इंग्रजांनी जबरदस्तीने खालसा केलेल्या संस्थानांनी इंग्रजांची कूटनीती ओळखून या स्वातंत्र्यसमराची पुढील सर्व योजना ठरविली. या योजनेमध्ये प्रमुख सेनानी होते नानासाहेब पेशवे, आजीमुल्लाखान, तात्या टोपे, रंगो बापू गुप्ते, बहादुरशहा जफर, महाराणी लक्ष्मीबाई, वीर कुंवर सिंह, मौलाना अहमद शहा, बेगम हजरत महल अशी असंख्य नावे सांगता येतील. खरेतर या संग्रामाची योजना शिवाजी महाराजांचे वंशज असलेले छत्रपती प्रतापसिंह भोसले यांचे दिवाण रंगो बापूजी गुप्ते आणि नानासाहेब पेशव्यांचे महामंत्री आजीमुल्लाखान यांनी लंडनमध्येच १८५४ साली तयार केली. इंग्लंडमध्येच इंग्रजांच्या सर्व बारकाव्यांचा विचार करून या दोघांनी ही योजना नानासाहेब पेशवे यांस सांगितली. या योजनेच्या व्यापक जनसमर्थनासाठी रंगोबापू संपूर्ण देशभर संन्याशाच्या वेषात फिरू लागले. जागोजागी धर्मोपदेशाच्या निमित्ताने लोकांमध्ये इंग्रजांविरुद्ध असंतोषाचे वातावरण तयार करू लागले. उर्वरित वेळात आपल्या सहकारी सेनानींसोबत क्रांतीची चर्चा करू लागले. देशाच्या प्रत्येक भागातील आपल्या विश्वासातील संस्थानांच्या माध्यमातून लोकजागरण करू लागले. सोबतीला अन्य संन्याशी, मुल्ला मौलवी, धर्माचार्य, ज्योतिषी, कलावंत यांच्या बरोबरीने समाजमन ढवळून काढू लागले. आजिमुल्लाखान यांनी तर स्वतंत्र गुप्तहेर संघटना उभी केली. तिच्या माध्यमातून इंग्रजांच्या प्रत्येक कृतीवर ते नजर ठेवून होते. संपूर्ण देशात इंग्रजांपेक्षा अधिक वेगवान अशी संदेशयंत्रणा प्रत्येक व्यक्तीच्या माध्यमातून त्यांनी उभी केली.

नानासाहेबांच्या या तीर्थटनानंतर सर्व स्थानांच्या संग्राम सिद्धतेचा आढावा घेऊन प्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामची तारीख निश्चित करण्यात आली. कसलेले सेनापती तात्या टोपे आणि इतर सर्वांनी रविवार दि. ३१ मे १८५७ हा दिवस संग्रामाचा दिवस म्हणून निश्चित केला. भारतातील मे महिन्यातील प्रचंड गर्मीमुळे याच काळात अनेक इंग्रज अधिकारी सुट्टीसाठी एकतर आपल्या मायभूमीकडे जात नाहीतर थंड हवेच्या स्थानी सुट्टीचा उपभोग घेण्यासाठी जात असत. दुसरी गोष्ट म्हणजे हा इंग्रजांच्या हक्काच्या सुट्टीचा दिवस होता. त्यादिवशी प्रत्येक इंग्रज अधिकारी हा नियमितपणे चर्चमध्ये जात असे. या सर्व गोष्टींची माहिती घेऊन संग्राम धुरिणींनी सर्वानुमते हा दिवस नक्की केला. प्रत्येक गोष्टीचा बारकाव्यांसहित विचार करुणच निर्णय घेण्यात आला, एवढी मोठी योजना केली तरी याचा सुगावा इंग्रजांना लागू शकला नाही. म्हणूनच त्यांनी हा अकस्मात उठाव होता अशी भलावण केली. प्रत्यक्षपणे या सर्व योजनेला चार वर्षांचा कालखंड लागला हो गोष्ट आपण सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे.

### ३१ मे १८५७

३१ मे १८५७ हा दिवस प्रत्येक नागरिकाला माहित होण्यासाठी जोडण्याच्या दृष्टीने या महाअभियानाचे माध्यम म्हणून रक्तकमळ व रोटी यांची अत्यंत योजनापूर्वक निवड करण्यात आली. रक्तकमळ प्रत्येक छावणीतून अत्यंत गुप्तपणे प्रत्येक भारतीय सैनिकाला आपल्या कर्तव्याची जाणिव करून देऊ लागला आणि प्रत्येक गावातून रोटी तयार होऊन रात्रीच्या अंधारात दुसऱ्या गावात पोहचून स्वातंत्र्यसंग्रामाची आठवण प्रत्येक सर्वसामान्य नागरिकांना करून देत होती. त्यावेळी इंग्रजांचे एकूण सैन्य ३ लाख ८३ हजार एवढे होते तर त्यातील भारतीय सैनिकांची संख्या

ही २ लाख ३८ हजार एवढी होती. या सर्व सैन्यदलाचा विचार करूनच या स्वातंत्र्यसंग्रामाची आखणी अत्यंत योजनापूर्वक करण्यात आली.

देशव्यापी स्वातंत्र्यसंग्रामाची तयारी अत्यंत गुप्तपणे पूर्ण होत आली. सर्वजण त्या दिवसाच्या प्रतिक्षेत आहेत, म्यानातील तलवारी बाहेर पडण्याच्या तयारीतच आहेत, वीरांचे भाले शत्रूच्या रक्तासाठी आसुरलेले आहेत, वीरांचे बाहू स्फूरण पावत आहेत, भारतीय तोफखाना आग ओकण्यासाठी सज्ज झालेला आहे तोच एक बातमी कानावर येवून धडकली की २६ मार्चला कलकत्याजवळील बरॅकपूर येथील इंग्रजांच्या पाचव्या कंपनीतील ३४ व्या रेजिमेंटमधील १४४६ क्रमांकाचा शिपाई क्रांतीवीर मंगल पांडे इंग्रज अत्याचारांनी अस्वस्थ झाला आणि त्याने तेथील इंग्रज अधिकारी सार्जंष्ट मेजर ह्युसन याचा पहिला बळी घेतला आणि स्वातंत्र्य यज्ञामध्ये पहिली आहुती अर्पण केली. ह्युसननंतर गोरा लेप्टनंट बॉबने मंगल पांडेला चेतावनी दिली आणि आपल्या पिस्तौलमधून निशाना साधला परंतु मंगल पांडे यांनी तो निशाना चुकवत आपल्या तलवारीने बॉबचा दुसरा बळी यज्ञास समर्पित केला. परंतु तोपर्यंत अन्य इंग्रज अधिकाऱ्यांना याची खबर लागताच संपूर्ण कंपनीने मंगल पांडेला घेराव घातला आणि बंदी बनविले.

### १३४ दिवस

मे महिना सुरू झाला सर्वजण आतुरतेने ३१ मे या दिवसाची वाट पहात होते तोच २४ एप्रिलला मेरठच्या छावणीमध्ये पुन्हा एकदा हल्लकल्लोळ झाला. भारतीय शिपायांनी गायीची व डुकरांची चरबी लावलेली काडतुसे वापरण्यास नकार दिला, म्हणून तेथील इंग्रज अधिकाऱ्यांनी अत्यंत हीनपणे त्यांचा छळ करून ८५ शिपायांना तुरुंगात पाठविले. दिनांक ९ मे ला भारतीय शिपाई खरेदीसाठी अथवा अन्य काही कामानिमित्त मेरठच्या बाजारात गेले असताना तेथे स्थानिक महिलांनी त्यांना डिवचले की तुमचे भाऊबंद बंदीवासात असताना तुम्ही इकडे मजेत फिरत आहात, तुम्हाला शरम वाटली पाहिजे. या चिथवणीने भारतीय सैनिकांची माथी भडकली आणि आता वेळ आली आहे या इंग्रजांना धडा शिकविण्याची म्हणून सर्वांनी एकत्रितपणे दुसऱ्या दिवशी म्हणजे १० मे १८५७ ला त्या छावणीमध्ये उठाव केला आणि बंदिवान असलेल्या सर्व सैनिकांना मुक्त केले. सर्वांच्या अंगात आता चैतन्य संचारलेले होते. आणि त्याचवेळी सर्वांनी दिल्लीकडे कूच करावयाचे ठरविले. दुसऱ्याच दिवशी सर्व सैनिक दिल्लीत पोहचले आणि इंग्रजांना काही कळण्याच्या आत दिल्ली काबिज केली. मेरठहून आलेल्या सैनिकांचा बिमोड करण्यासाठी दिल्लीच्या इंग्रज अधिकाऱ्याने पूर्ण विश्वासाने आपली कंपनी बोलावली. परंतु त्या कंपनीच्या सर्वच भारतीय सैनिकांनी आपल्या शिपायांचीच साथ दिली त्यामुळे दिल्लीचे इंग्रजांचे शासन संपुष्टात आले. भारतीय शिपायांनी दिल्ली काबिज केली आणि तेथील बादशहा बहादुरशहा जाफर यांना आपला सम्राट म्हणून सिंहासनावर बसविले. त्यानंतर इंग्रजांना १३४ दिवस सतत दिल्ली घेण्यासाठी झुंजावे लागले. ठिकठिकाणी असलेल्या आपल्या सैनिकांना आदेश देऊन त्यांनी दिल्लीला घेराव घातला. २४ सप्टेंबर १८५७ ला पुन्हा एकदा आपल्या सर्व सामर्थ्यानिशी इंग्रजांनी दिल्लीवर आपला ताबा मिळविला. दिल्ली पाठोपाठ अन्य प्रमुख शहरांतही स्थानिक जनता आणि संस्थाने यांनी इंग्रजांना सळो की पळो केले. परंतु आपल्याच भारतीयांच्या फुटीरतावादी वृत्तीमुळे या स्वातंत्र्य लढ्यात आपल्याला पराभव पत्करावा लागला. असंख्य वीरांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली, त्यांची गणती करणे अवघड आहे. अशा सर्व ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांस विनम्र अभिवादन.

श्री. शशिकांत पा. गाणार

डोंबिवली

# स्वातंत्र्योत्तर भारत आणि राष्ट्रपती परिचय
# डॉ. राजेंद्रप्रसाद


भारतरत्न डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या कारकीर्दीचा हा आज परिचय - संपादक

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त झाला तेव्हा भारतामध्ये गांधीयुग होते. स्वातंत्र्यप्राप्तीत महात्मा गांधीजींचे योगदान सर्वश्रुत आहेत. त्यांच्या विचारातून व आचारातून भारतामध्ये अनेक तरुणांची फळी निर्माण झाली. त्यापैकीच डॉ. राजेंद्रप्रसाद एक होत.

राजेंद्रप्रसाद हे मूळचे बिहार प्रांतांचे. त्यांचा जन्म ३ डिसेंबर १८८४ रोजी झेरादेई गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव महादेव सहाई होते.

बालपणापासूनच राजेंद्रप्रसाद हे हुशार व कुशाल बुद्धिमत्तेचे होते. शालेय व महाविद्यालीन शिक्षण घेत असताना ते सर्वप्रथम येत. ते कलकत्ता विश्वविद्यालयात प्रवेश परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले व दर महिन्याला ३० रुपये शिष्यवृत्ती मिळविली. १९१५ मध्ये त्यांनी कायद्याची पदव्युत्तर पदवी परिक्षा चांगल्या गुणांनी पास केली व त्यामध्ये त्यांना सुवर्णपदक ही मिळाले. त्यानंतर त्यांनी कायद्यामध्येच पी.एच.डी. मिळविली आणि ते डॉ. राजेंद्रप्रसाद झाले.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपल्या जीवनाची सुरुवात एक व्यवसायिक वकिल म्हणून केली. कलकत्त्यातच ते वकिली करीत, परंतु तो काळ इंग्रज राजवटीविरुद्धच्या असंतोषाचा होता. त्या राजवटीविरुद्ध गांधीजींनी असहकार पुकारला होता. त्यातच बंगाल प्रातांत स्वातंत्र्याच्या चळवळीने जोर धरलेला होता व डॉ. राजेंद्रबाबू कलकत्त्यातच वकिलीच्या नात्याने हे जवळून पाहत होते. शिवाय त्या काळात गांधीजींच्या विचाराने संपूर्ण भारत प्रभावित झाला होता. आपसुकच डॉ. प्रसाद ही विचाराने व आचाराने प्रभावित झाले व गांधीजींचे एक विश्वासू अनुयायी बनले. त्यांनी गांधीजींच्या विचारांचा व आदर्शाचा प्रसार करण्यास सुरुवात केली. १९१७ च्या चंपारण्य सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला व त्यांचे नेतृत्वही केले. १९०५ साली लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली आणि देशात असंतोषाचा भडका उडाला आणि अनेक ठिकाणी स्वदेशी चळवळ व बहिष्काराचा नारा सुरू झाला. डॉ. राजेंद्रप्रसाद ही त्यावेळी कलकत्त्यातच होते.विद्यार्थीदशेतच हे त्यांनी जवळून पाहिले व त्यांच्या मनावर खूप परिणाम झाला. पुढे महात्मा गांधीजींच्या आदर्शाचा व बहुजनाविषयीचे प्रेम इत्यादी गोष्टींने ते प्रभावित झाले. सर्वसामान्यासाठी व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी गांधीजी जसे झगडत होते, त्यांच्या आदर्शाने राजेंद्रबाबू प्रभावित होऊन एकदम ते साधेपणाने राहू लागले. स्वतःचे काम ते स्वतः करू लागले. आपल्याकडे कामाला असणारे नोकरही त्यांनी कमी केले



व दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी आपला बहुमोल वेळ देऊ लागले.

दरम्यान अशातच जनरल डायरने जालियनवाला बागेत घडवून आणलेल्या गोळीबाराने डॉ. राजेंद्रप्रसाद अत्यंत व्यथित झाले. त्या घटनेने ते खूपच हेलावले. त्यांनी लगेचच बिहार प्रांतात इंग्रजाविरूद्ध असहकार चळवळ सुरू केली. ते गांधीजींच्या चळवळीचे प्रमुख हत्यार होते. त्यांनी वकिली व्यवसाय बंद केला आणि पूर्ण वेळ गांधीजींच्या समवेत राहून देशासाठी जे जे करता येईल ते करू लागले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे ते तीन वेळा अध्यक्ष होते (१९३४, १९३९ व १९४७ या कालावधीत). स्वातंत्र्याचा लढा खूपच तीव्र झाला. त्यातच दोन्ही समाजात फूट पडून विभाजनाची मागणी जोर धरू लागली. रोजच्या दंगलीने आणि जाळपोळीने सर्वच नेते हतबल झाले. अखेर

स्वातंत्र्याच्या लढ्यात भारतखंड यशस्वी ठरले आणि त्याचवेळी भारतखंडाचे दोन भागात विभाजन होऊन भारत व पाकिस्तान अशी दोन राष्टे जगाच्या नकाशावर उदयास आली.

देशाला स्वातंत्र्य मिळाले तो दिवस होता १५ ऑगस्ट १९४७. मात्र जुलै १९४६ रोजीच घटना समितीने भारतीय राज्यघटनेचा कच्चा मसुदा बनविण्याचे काम चालू केले होते. त्या घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची निवड केली होती. घटना समितीने नोव्हेंबर १९४६ रोजी आपले काम पूर्ण केले व २६ जानेवारी १९५०, ती भारतीय लोकांसाठी स्वीकारली गेली आणि त्यादिवसापासुन भारतीय राज्यघटना अंमलात आली आणि डॉ. राजेंद्रप्रसादांची स्वतंत्र भारताचे व भारतीय राज्यघटनेनुसार पहिले राष्ट्रपती म्हणून ३० जानेवारी १९५० रोजी निवड झाली. डॉ.प्रसाद ३० जानेवारी १९५० ते १३ मे १९६२ या कालावधी दरम्यान त्यांनी हे पद भूषविले.

जवळ - जवळ १२ वर्षे ते राष्ट्रपती म्हणून त्या पदावर होते. त्यांनी केलेल्या बहुमोल कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना सर्वोच्च अशा 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित केले.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपल्या सामाजिक व राजकीय जीवनात अनेक चढउतार पाहिले. त्यांनी स्व:ताचे 'आत्मकथा' (१९४६) नावाचे आत्मचरित्र लिहिले. 'चंपारण्यामधील सत्याग्रह' (१९२२) भारताची फाळणी (१९४६), महात्मा गांधी आणि बिहार, बापू के कदमों में (१९५४), काही जुन्या आठवणी (१९४९) इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिले.

प्रखर बुद्धिमत्ता, गांधीजींच्या विचारांचा प्रभाव, देशप्रेम, राजकीय व सामाजिक कार्याची ओढ इत्यादी चांगले गुण त्यांच्या अंगी होते म्हणूनच भारतीय राज्यघटनेचे सर्वोच्च पद त्यांच्याकडे आले.

शेवटी त्यांचे देहावसान बिहार मधील पाटणा येथील आश्रमात २८ फेब्रुवारी १९६३ रोजी झाले. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून भारतीयांच्या कायम ते स्मरणात राहिले.

**चंद्रकांत शिंगाडे**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन,

ठाणे - ४०० ६०१.

## २१व्या शतकातील भावी शिक्षक -

ठाण्यात नोव्हेंबरमध्ये झालेल्या बाल शिक्षण परिषदेतील काही निवडक निबंध दिशात होणार आहेत. परिषदेच्या ठाणे विभाग अध्यक्षा श्रीमती कुमुदिनी बल्लाळ व सचिव सौ. विशाखा देशपांडे यांनी याबाबत दिशाला केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभार - संपादक

सदर निबंध शिक्षणशास्त्र पदवी व पदविकेच्या प्रशिक्षणार्थींच्या पहाणीवर आधारित आहे.

शिक्षकी पेशा हा केवळ नोकरीची हमी म्हणून स्वीकारण्याकडे कल

स्वत:च्या कुवतीबद्द्ल फाजील विश्वास

सदोष उत्तरलेखन, व्याकरणाचे ज्ञान अत्यल्प

मोठी स्वप्नं, पण प्रयत्न अपुरे

मी वैद्यकीय व्यवसाय करताना, माझ्या भोवतालच्या जगात शुद्धलेखनाबद्दल अनास्था गेली २० वर्षे सतत मला जाणवत होती. कोणाच्याही लेखनातील आणि संभाषणातील व्याकरणाच्या चुका पाहून मला अस्वस्थता यायची; पण इतरांना हे फारसे खटकत नाही हेही प्रखरपणे जाणवायचे. समाजातील जे काही शिक्षक व विद्यार्थी माझ्या संपर्कात यायचे त्यातूनही सतत जाणवत होते की सध्याच्या विद्यार्थ्यांना शिक्षकांबद्दल फारसा आदर दिसत नाही आणि हेही लक्षात येत होते की, शिक्षकांना देखील ज्ञानाने मोठे होता येते याबद्दल आत्मविश्वासच उरलेला नाही. आजच्या माणसांना ऐहिक प्रेरणा पटकन खुणावतात. कुटुंबामध्ये देखील वाचनाचा पूर्ण अभाव जाणवतो. एखाद्या प्रसंगी सप्रेम भेट म्हणून पुस्तक देण्याची माझी सवय माझ्या अपरोक्ष हास्यापद गोष्ट होती. आपले ज्ञान अद्यावत करण्यासाठी, आपण जो विषय शिकवतो त्या विषयाची, अभ्यासक्रमाव्यतिरिक्तची पुस्तके वाचून वेगवेगळे संदर्भ गोळा करत, अभ्यास करून वर्गावर शिकवायला जाणारे शिक्षक/प्राध्यापक मला अभावानेच दिसले. शिक्षकाभोवती विद्यार्थी रेंगाळतात असे चित्रही अभावाने दिसले. पालकांजवळ तर केवळ परीक्षेतील गुणांचाच तराजू आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हे सगळेच घटक निश्चितच मारक आहेत. नेमके काय करावे?

एक प्रसंग आठवतो. माझी मुलगी इयत्ता ६वीत होती. तिला 'नेता' शीर्षकाचा पाठ होता. तिच्या वहीत मी शब्दार्थ वाचले. तिने लिहिले होते नेता-मिनिस्टर! व तिला व्हेरी गुड असा शेरा मिळालेला होता. तिला विचारल्यावर तिने उत्तर दिले की, शिक्षकेनेच हे सांगितले. ती पुढे म्हणाली टिचरने असेही सांगितले की नेता - मिनिस्टरलाइक नेहरू फादर.

मुलांच्या कोवळ्या मेंदूमध्ये किती चुकीची प्रतिमा पक्की बसणार होती! मला फार अस्वस्थता वाटली. मी शाळेत जाऊन त्या शिक्षकेला भेटून चर्चा केली व मुलांना नेता वेगळा आणि मंत्री वेगळा असतो हे समजावून सांगण्याची विनंती केली. ती शिक्षका मला असे म्हणाली की, 'उसको तो व्हेरी गुड रिमार्क दिया था, फिर आपकी क्या कंम्प्लेंट है?' मला ही फार गंभीर बाब वाटली. पालकांनी फक्त मुलांच्या गुणांसाठीच शिक्षकांना भेटावे अशी धारणा समाजात रूढ होत चालली आहे का? माझी तळमळ, मुलांना शब्दाचा नेमका अर्थ कळावा ही होती. शिक्षकेने मुलांना सांगितलेला शब्दाचा अर्थ अचूक नव्हता आणि त्यामुळे माझ्याच मुलीला मिळालेला शेरा मला समाधान देण्यास पुरेसा नव्हता. पण असे किती वेळा किंवा किती पालक अशी सजगता दाखवू शकतील? गेल्या २०

वर्षात असे अनेक प्रसंग मला अस्वस्थ करत गेले. या पार्श्वभूमीवर मी १०वीत असताना आम्हाला विज्ञान शिकविणारे कतराळेसर आठवतात. माझा जो कोणी विद्यार्थी डॉक्टर होऊन रुग्णसेवा करेल त्याचा फोटो मी देवघरात ठेवीन असे ते तळमळीने म्हणायचे व शाळा संपली तरीही न कंटाळता, मुलांच्या प्रश्नांची, शंकाची उत्तरे देत राहायचे. आज तळमळीचे, हाडाचे शिक्षक अभावानेच दिसतात.

अगदी अनपेक्षितपणे, मागील ३ वर्षांपासून प्रज्ञा प्रतिष्ठान या संस्थेअंतर्गत संचालक म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. भावी शिक्षकांचा दर्जा चांगला असावा हाच माझा प्रयत्न असतो. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची शिक्षणाशी बांधीलकी असावी असे वाटते. म्हणूनच खालील पाहणी केली.

प्रज्ञा प्रतिष्ठानच्या वतीने डी. एड. व बी. एड.च्या १००० प्रशिणार्थींचा प्रश्नावलीच्या माध्यमातून अभ्यास केला. ११ महाविद्यालयांतील ६०० डी. एड. चे व ४०० बी. एड. चे विद्यार्थी या पाहणीत समाविष्ट आहेत.

**प्रश्नावली**

१००० प्रश्नावलींच्या अभ्यास केल्यावर प्रथम जाणवले की या पिढीचे प्राथमिक शिक्षणच नीट झालेले नाही. 'शुद्धलेखन' हा शब्दच त्यांच्या शब्दकोशात नाही व त्याबद्दल जाणीव नाही, खंत तर नाहीच नाही. मुले प्रश्नावली सोडवताना पुरेशी सजग, गंभीर नव्हती. प्रश्नाचे उत्तरे काहीतरी दिलेच पाहिजे,म्हणून संदर्भहीन, प्रसंगी हास्यास्पद उत्तरे सापडली. अनेकांनी छापील उत्तरे दिली. स्वतःचा विचार कुठेच नाही. विशेष म्हणजे शिक्षक पिढी घडवितो, कुंभाराप्रमाणे मातीतून शिल्प घडवितो. वगैरे लिहिणारी मुले शेवटी एम्पीएस्सी देणार, अधिकारी होणार हे मात्र नक्की लिहितात. काय खरे? काय खोटे? शिक्षक होण्यासाठी आवश्यक असे प्रशिक्षण घेण्यास आलली ही मुले, यांची शिक्षक या पेशाशी बांधिलकी मात्र जाणवत नाही.

३) 'मला लहानपणापासून शिक्षक व्हायला खूप आवडते' 'शिक्षक होण्याचा छंद होता' हे वाक्य १०३ उत्तरांत आहे. शिक्षक यावर विश्वास बसणे कठीण आहे! एका उर्दू भाषिक विद्यार्थ्याने 'बचपन' हा शब्द 'पचपन' असा लिहिला! त्याने देखील शिक्षक होण्याचे स्वप्न होते व पुढे तो एम्पीएस्सी देखील देणार आहे.

४) एका विद्यार्थिनी Science हा शब्द ४ ते ५ वेळा खाडाखोड करून अंतिमतः Science असा लिहिते व पुढे एक उत्तरात मी इंग्रजी व विज्ञान हा विषय प्रभावीपणे शिकवीन असे लिहिते. हीच मुलगी पुढे छंदात-ब्युटी टिप्स वाचणे व गोळा करणे हा छंद आहे असेही लिहिते. एम्पीएस्सी देणार का? याचे उत्तर तर दिग्मूढ करणारेच आहे... 'तसे मला लहान मुलांना शिकवायला आवडेल परंतु मी माझे शिक्षण चालूच ठेवणार आहे.'

याचा अर्थ असा की तिला एम्पीएस्सी परीक्षाच माहीत नसावी. हीच मुलगी लेखन करते कहाणी, एकपात्री प्रयोग लिहिते. अर्थातच् तिच्या सगळ्या उत्तरात लहान मुले, अशा चुका तर सापडतातच.

५) घरात कोणकोणती पुस्तके आहेत?

या प्रश्नाचे उत्तर अनेकांनी धादांत खोटे किंवा उगीचच लिहायचे म्हणून लिहिले. घरे वेगवेगळी विनोदी, धार्मिक विषयांची, योगासने, स्पर्धा परीक्षा इ. पुस्तके आहेत अशी अस्पष्ट उत्तरे ३९४ मुलांनी लिहिली आहेत. 'घरी कोणकोणती पुस्तके नाहीत' हे उत्तर ६०० मुलांनी लिहिले. घरी पुस्तके नाहीत असे लिहिण्यास संकोच वाटल्यामुळे मुलांनी अस्पष्ट उत्तरे लिहिली असावीत किंवा घरी असलेली पुस्तकं मुलं कधी हाताळत नसावीत, नक्की पुस्तकांची नावे किंवा लेखक माहीत नसतील यामुळेदेखील

'धार्मिक' 'विनोदी' अशी ढोबळ उत्तर दिली असातील.

स्पीकवेल इंग्लीश, स्पर्धा परीक्षेची तयारी, नवनीत ही पुस्तकं घरी आहेत अशी उत्तरे २५ ते ३० टक्के मुलांनी लिहिली आहेत. स्पर्धापरीक्षा देऊन मोठे व्हायचे, या विचाराने मुले प्रेरित आहेत असे वाटते पण त्यांची कुवत फार सामान्य आहे अन् याची किंचितही जाणीव त्यांना नाही!

शिव खेराचे You can win हे पुस्तक वाचले असे उत्तर लिहिणारा विद्यार्थी पुस्तकाचे नाव मात्र You can You लिहितो! 'व्यक्ती आणि वल्ली' हे पुस्तक वाचले असे एक मुलगी लिहिते. हीच मुलगी 'माझ्याकडे ५ ते ६ पुस्तक आहेत' असेही लिहिते. तिच्या घरी 'स्पीकवेल इंग्लीश' देखील आहे म्हणे!

६) आई-जि.प. मुख्याध्यापिका, मामा/मामी/ मावशी/भाऊ-शिक्षक अशा कुटुंबातील मुलगी १०वीत ८६% व १२वीत ८२% मिळवते व MBBS ला प्रवेश मिळाला नाही म्हणून DEd करते, पण उत्तरात मात्र शिक्षक व्हायचे आहे, 'मुलांच्या समस्या सोडवण्यात आनंद वाटतो' असे लिहिते.

१२ वी नंतर सुट्टीत अनेक गोष्टींची पुस्तके वाचली असे ढोबळ उत्तर लिहिते. या मुलीच्या घरी 'पंचतंत्रातील गोष्टी, सामान्य ज्ञान' इ. पुस्तके आहेत. शिक्षकांच्या कुटुंबात देखील कोणत्या दर्जाची पुस्तके आहेत हे पाहून सखेद आश्चर्य वाटले.

शिवाय हीच मुलगी 'एमपीएस्सी देणार' असे उत्तर लिहिते. विचारांना दिशा नाही. स्पष्टता नाही, केवळ गोंधळच आहे असे वाटते. या घरात जवळजवळ ५ माणसे शैक्षणिक वातावरणातील आहेत, तरी हे चित्र! ज्यांचे पालक खेड्यात, आदिवासी भागात आहेत त्यांच्याबद्दल काय अपेक्षा ठेवावी?

७) छापील उत्तर - शिक्षक म्हणजे शिस्तप्रिय, क्षमताधिष्ठित' लिहितांना अर्थातच त्यांची दमछाक झाली आहे.

'कर्तव्यनिष्ठ' शब्द केवळ ५२ मुलांनी अचूक लिहिला पण तोही योगायोगाने अचूक आला असेल असे वाटते, कारण याच ५२ मुलांची 'क्षमताधिष्ठीत' लिहितांना दमछाक झाली! ५ मुलांनी दोन्ही शब्द अचूक लिहिले आहेत. पण इतर जर शिक्षक Great असतो असे यांना प्रामाणिकपणाने वाटतोय, तर मग हीच मुले एम्पीएस्सी देऊन उच्चपदावर जाण्याचे ध्येय का ठेवतात हे कळत नाही.

८) उत्तरातील तफावत : छंद, क्रिकेट खेळणे, लिहिणे (अशुद्ध लेखन)

लेखन करता का? नाही?

एम्पीएस्सी देणार का? हो. अधिकारी व्हायचे आहे.

एक विद्यार्थी लिहितो.

प्र. प्राथमिक शिक्षकांबद्दल तुमचे मत काय?

उ. सर्व गुण संपन्न आहेत.

प्र. शिक्षक व्हा असे तुम्हाला कुणी सांगितले?

उ. आतापर्यंत कोणीच व्हा म्हणले नाही. मी मनाने हा व्यवसाय निवडला. शिक्षकीपेक्षा पवित्र असतो. सुजाण पिढी घडवतो. एमबीएसपी देणार का? हो मोठ्या पदावर जायचे आहे.

हाच मुलगा आवडती गायिका लता मंगेशकर लिहितो. एकूण ५ मुलांनी लता लिहिले. (प्राथमिक शिक्षण सदोष आहे.)

९) १०/१२ वीचे; गुण आणि मुलांनी उत्तरे यात: विरोधाभास जाणवला.

एकूण १०० प्रश्नावली तपासल्या. त्यापैकी १०वीत/१२वीत , ४८७ मुलांना विशेष प्रावीण्य देण्यात आले व २८५ मुलाना प्रथम श्रेणी मिळालेली आहे. पण या मुलांच्या उत्तरांमधून कुठेही दर्जा जाणवला नाही. १५ टक्के मुलांचे अक्षर रेखीव आहे. पण शुद्धलेखनाची जाणच नाही.

७०% गुण घेणारी मुलगी 'आमिता बच्चेण' असे लिहिते. 'अध्ययन अध्यापण आवडते, ज्ञान देल्याने वाढते.' असे उत्तर लिहिले. 'निशिगंधा वाड' असे लिहिते. छंद काय तर अभ्यास करते, कलाकूसरीचे ट्रप्स जमवेन असे लिहिते. लेखन करता का? हो? एम्पीएस्सी देणार का? हो?

कोणती पुस्तके वाचली? तर स्पीक्रेल, नवनीत हे उत्तर!

१०) घरी कोणती पुस्तके आहेत.

कुटुंबात कोणी शिक्षक आहेत का?

या प्रश्नांची उत्तरे वाचून फार निराशा झाली. शिक्षित पालकांचे वाचनदेखील नगण्य सदरात मोडते. घरी पुस्तकच नसावीत. दै. लोकमत मधील 'सखी' वाचण्यावर मुलींचा भर आहे. यात एकही उत्तर अचूक/नीट नव्हते.

पुस्तक व लेखकाचे नाव नीट लिहिले, असे एकही उत्तर नव्हते. स्वामी, अग्निपंख, श्यामची आई ही नावे वारंवार दिसली पण लेखकाची नावे नव्हती.

'अमुक एक पुस्तकामुळे जगण्यावर प्रभाव पडला' असे तर एकही उत्तर सापडले नाही.

शैक्षणिक वातावरणातील मुलेही उत्कृष्ट उत्तरे लिहू शकली नाहीत.

१) गरीब मुलांनी पुस्तके/दैनिके न वाचण्याची कारणे गरिबी अनुपलब्धी ही दिली. पण याच मुलांनी दूरदर्शन वरील आवडत्या कार्यक्रमाची यादी लिहिली आहे. ही विसंगती जाणवते. आई/वडिल भरपूर वाचन करतात असे एकही उत्तर नाही. सदोष वाक्यरचना, व्याकरणाचे किमान ज्ञान नाही : १०वी व १२वी टक्केवारी चांगली असून देखील लेखनात मात्र प्रचंड दोष जागोजागी आढळले. १) १०वी विज्ञान ८८ टक्के गुण प्राप्त केलेली मुलगी मला एम्पीएस्सी परीक्षा देऊन ISI अधिकारी व्हायचे आहे असे उत्तर लिहिते.

२) एम्पीएस्सी देणार त्यामुळे नॉलेज वाढतो असे एक BA झालेला मुलगा लिहितो.

३) BA (Psychology) मुलगी, चांदोबा, पंचतंत्र, सामान्य ज्ञान, सखी टिप्स एवढेच वाचन करते. 'लहान मुलांची टिर्वीशन घेतच होते पूर्वी, म्हणून शिक्षीका व्हायचे ठरवले' असे उत्तर लिहिते.

४) एकच उत्तरपत्रिका आशादायी वाटली.

वाडी तांड्यावर शिक्षिका नसतात म्हणून मी D.Ed करत आहे. एम्पीएस्सी देणार नाही, शिक्षिकाच राहणार आहे मी MA करीन.

अनुताई वाघ यांचे पुस्तक वाचले. असे लिहिले. पुस्तकाचे शीर्षक लिहिले नाही. पण सगळी उत्तरे प्रामाणिक वाटली. छापील, खोटे दांभिक असे काही नव्हते.

या उत्तरांमधून हेही जाणवले की १०वी/१२वी चे गुण ६०/७० टक्केच होते. यापेक्षक ही जास्त टक्केवारी असणाऱ्या विद्यार्थ्यांची उत्तरे, त्यांचा वैचारिक दर्जा, त्यांचे सामान्यज्ञान आणि त्यांची अभिरुची हे सगळे निराशजनक वाटले.

निरिक्षणाअंती सापडलेली काही दर्जाहीन उत्तरे :

१) शिक्षकी पेशा असा आहे की ज्यामुळे सजीव

निरागस घटकासोबत संबंधित राहू शकतो. विशेष म्हणजे - असे उत्तर देणार विद्यार्थी एम्पीएस्सी देऊन उच्च पदावर काम करणे हे माझे ध्येय आहे असेही लिहितो.

२) नाही मी हीच नोकरी मिळाल्यास पुढे प्रयत्न करणार नाही इथेच सेवा करणार .

३) हो जे-जे प्रयत्न करता येतील त्यासाठी प्रयत्न करणार आहे.

४) कारण मला लहानपणापासून एकच ध्यास होते की मी शिक्षक होणार. मला शिक्षक व्हायला खूप आवडते. व शिकवणे मला आवडते म्हणून मी शिक्षक व्हायचे ठरवले. याच मुलाचे स्वतःचे नाव हानमंत असे लिहिलेले आहे. हा पदवीधर आहे!

५) माझ्यसारखे अधिक परिस्थितीचे दुर्बल असलेले घटक शिक्षणापासून वंचीत असतात. त्यांना आपण शिक्षक होऊन सुशिक्षित करण्यासाठी व समाजात एक उत्तम नागरिक होण्यासाठी. (उत्तर अर्धवट सोडले आहे.)

६) आजच्या प्राथमिक शिक्षकाविषयी त्यांना वेतनवाढ द्यावी, तरच ते त्यांचे काम व्यवस्थित करतील अथवा कुटुंब चालवण्यास त्यांना प्रसंग निर्माण होता.

७) अशा काही गोष्टी असतात त्या आई वडीलाची इच्छा असते माझ्या आई वडीलाची इच्छा होती पण माझी इच्छा होती. आजच्या ग्रामीण शाळेची अवस्था चांगली नाही. मला शिक्षिका झाल्यानंतर अशा ग्रामीण शाळेतील अवस्था सुधारण्याचा पर्यंत मी करिण असे वाटले म्हणून हा शिक्षक पेशात मि प्रवेश केला.

८) मैत्रिनी ५ ते १० जन शिक्षक आहेत.

९) एम्पीएस्सी ला प्रयत्न केला पन प्रेवेस मिळाला नाही.

१०) माझ्यामध्ये मित्र कोणताच शिक्षक नाही.

या धक्कादायक पाहणीनंतर इतकेच वाटते की, या उद्याच्या शिक्षकांना शुद्धलेखन शिकवावे लागेल. शीक्षणाशी बांधिलकी त्यांच्यात रुजवावी लागेल. घराघरात वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी अर्थपूर्ण प्रयत्न करावे लागतील. महाराष्ट्रात जिथे जिथे अशा भावना मनात असणारी माणसे आहेत त्यांच्याशी संपर्क करून सर्वांनी मिळून प्रयत्न करावे लागतील आणि साणखीन एक महत्त्वाचे बाब म्हणजे या पिढीची मानसिकता समजून घ्यावी लागेल. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण व शिक्षक, प्राध्यापक यांचेही प्रश्न लक्षात घ्यावे लागतील. सर्वांच्या समन्वयाने, चर्चेने, उपाय शोधत हे निराशजनक चित्र बदलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

श्री हेरंब कुलकर्णी
सौ. वृषाली किन्हाळकर
भ्रमण ध्वनी : ९४२२८७७३६५

# परिसरवार्ता

## ए.के. जोशी इंग्लीश मिडीयम स्कूल

### बाल शिक्षण परिषदेसाठी निबंध

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे १४ वे ठाणे येथील राज्यस्तरीय अधिवेशन १६,१७,१८ नोव्हेंबर रोजी ठाणे येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या पटागणांत पार पडले.

या अधिवेशनात अनेक शोधनिबंध सादर झाले, अनेक चर्चा झाल्या ए.के. जोशी शाळेच्या पूर्व-प्राथमिक विभागातील दोन शिक्षिका सौ. प्रीती कुलकर्णी व सौ. अपर्णा वरुडकर यांनी 'इंग्रजी बालशाळेतील भाषा विकास कार्यक्रम - शिक्षकांचा दृष्टिकोन' या विषयावर शोधनिबंध सादर केला. जवळपास एक वर्षभर ठाणे शहरातील इंग्रजी माध्यम शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याशी चर्चा व मते जाणून घेतली. नंतर या सर्व माहितीचे एकत्रीकरण करुन टक्केवारी काढली. अशा स्वरूपाचे काम या दोघींनी वर्षभर केले.

'इंग्रजी बालशाळेतील भाषा विकासाचा कार्यक्रम-शिक्षकांचा दृष्टिकोण' या शोधनिबंधाची उद्दिष्ट :-

१) 'इंग्रजी बालशाळेत मुलांच्या प्रथम भाषेचा स्वीकार कितपत केला जातो, यावर शिक्षकांची मते जाणून घेणे. २) शाळांमध्ये भाषा शिक्षणाची पद्धत कशी आहे याबद्दल माहिती मिळवणे. ३) संभाषण कौशल्यास शिक्षक कितपत महत्त्व देतात, यावर शिक्षकांचे मत जाणून घेणे. ४) लेखन वाचनाचा कार्यक्रम इतर शाळांमधे कसा राबवला जातो याबद्दल शिक्षकांचा दृष्टिकोन समजावून घेणे.

यातील प्रत्येक उद्दिष्टांअंतर्गत मतावलीत व प्रश्नावलीत शिक्षकांना काही विधाने व प्रश्न देण्यात आले होते त्यासाठी पर्यायही देण्यात आले होते. शिक्षकांनी आपली मते देणे अपेक्षित होते. या सर्व अभ्यासात १२ शाळांमधील ६१ शिक्षकांनी आपली मते दिली.

वरील एक उद्दिष्ट व त्याचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

**१) प्रथम भाषा स्वीकार :-**

इंग्रजी बालशाळेत येणाऱ्या सर्वच मुलांची मातृभाषा इंग्रजी नसते म्हणून त्यांच्या प्रथम भाषेचा म्हणजेच मातृभाषेचा स्वीकार निश्चितपणे केला पाहिजे.

२) पहिल्या दिवसापासूनच शिक्षिकेशी इंग्रजीतून संभाषण केले पाहिजे, अशी सक्ती असू नये.

३) बालशाळेतील शिक्षिकेने संभाषणासाठी मिश्र भाषांचा वापर करावा.

४) बालवाडीत कुठल्याही भाषेचा अडसर न ठेवता इंग्रजी व्यतिरिक्त इतर भाषांमधूनही गाणी व बडबडगीते शिकवली जावीत, यात भाषेचा अडसर असता कामा नये, कारण गाणी बडबडगीते यांचा मूळ उद्देश मुलांना त्यांतून निखळ आनंद मिळावा. त्यांचे मनोरंजन व करमणूक व्हावी हाच असतो

**२) भाषा शिक्षण पद्धत**

- मातृभाषा इंग्रजी नसलेली अधिकतर मुल शाळेत येतात, तेव्हा त्यांच्यासाठी भाषेचा कार्यक्रम आखताना काही गोष्टी लक्षात ठेवूनच तो आखला गेला पाहिजे. उदा. मुलांचा मातृ भाषेकडून इंग्रजीकडे होणारा विकास हा एकदम होणार नसून तो टप्प्याटप्प्याने होणार आहे. हे लक्षात ठेवूनच त्यानुसार भाषा विकासात मदत करणाऱ्या कृती

वरंवार दिल्या गेल्या पाहिजेत.

- मतावली, प्रश्नावलीनुसार शिक्षक चित्र, वस्तूवाचन संभाषण या कृती भाषा विकासाचे सर्वोत्तम पर्याय मानतात. पण प्रत्यक्षात मात्र शाळांतून या कृती फारच कमी प्रमाणात घेतल्या जातात असे आढळले.

- बालवाडीतील मुलांना लेखन, वाचन येत नाही. मग व्याकरणाचे पाठ शिकण्यासाठी शिक्षकांनी प्रत्यक्ष कृतीचा वापर करावा, कारण तो सर्वात उत्तम मार्ग आहे, पण ५०% शिक्षक व्याकरणाचे पाठ खडू, फळा आणि पुस्तक या साधनांद्वारे शिकवावे या मताचे आहेत. तर ५०% शिक्षक हेच पाठ कृतीद्वारा शिकवावे या मताचे आहेत.

### ३) संभाषण कौशल्य

भाषा विकासात शिक्षक संभाषणास किती प्राधान्य देतात, भाषाशिक्षणासाठी कोणकोणत्या कृती मदत करणाऱ्या आहेत याबद्दल काही विधाने या उद्दीष्टांअंतर्गत होती.

- मातृभाषा आणि शिकण्याचे माध्यम असणारी भाषा भिन्न असते; तेव्हा संवाद साधताना मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते.

- पूर्व प्राथमिक विभागात मुलांना गोष्टी सांगितल्या जातात, त्यांचा उद्देश मुलांची करमणूक, मनोरंजन व्हावे असा असतो. पण यातून भाषा विकासाला सुद्धा खूप मदत होते. पण या गोष्टींचा आनंद मुलांनी घेण्यापेक्षा त्या पाठ करून परीक्षेत सांगता याव्यात याकडे शिक्षकांचा कल दिसून येतो.

### ४) लेखन, वाचन कार्यक्रम

ज्यूनिअर केजीतील मुलांचा वयोगट ३॥ ते ४॥ वर्षे असतो. या वयात त्यांच्या हाताचे स्नायू लिहिण्यास परिपक्व नसतात.

- खरं तर, शास्त्रीय दृष्ट्या या वयातील मुलांना लेखन वाचन पूर्व तयारीच्या कृती भरपूर प्रमाणात दिल्या गेल्या पाहिजेत. पण तसे न होता अधिकतर शाळांतून मुलांवर लिहिण्याची सक्ती केली जाते. यामुळे मुलांवर प्रचंड ताण येतो. परिणामी मुलांना लिखाण कंटाळवाणे वाटते.

- काही शिक्षकांनी तर नर्सरीतच थोड्या प्रमाणात लेखन, वाचन कार्यक्रम चालू करावा असे मत दिले आहे.

- शास्त्रीय दृष्ट्या सिनीयर के.जी. च्या दुसऱ्या स्तरात म्हणजे ४॥ ते ५॥ या वयात मुलांचे हाताचे स्नायू लिहिण्यासाठी पूर्णतः परिपक्व होतात. याच वयात त्यांना लेखन देणे योग्य आहे.

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या काही पदाधिकाऱ्यांनी अतिशय अभ्यासपूर्वक बालशाळांसाठी 'विकासात्मक शिक्षणक्रम' तयार केला आहे. याच शिक्षणक्रमानुसार ए.के. जोशी शाळेत हसत खेळत शिक्षणपद्धत गेली ६ वर्षे चालू आहे. सर्व पूर्व प्राथमिक शाळांनी एकत्रितपणे हा शिक्षणक्रम राबवावा. विशेषतः भाषा विकास कार्यक्रमात सुसूत्रता आणावी.

**सौ. प्रीती कुलकर्णी, सौ. अपर्णा वरुडकर**

शिक्षिका, ए.के. जोशी इंग्लीश मिडीयम स्कूल,

पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे.

## माध्यमिक विभाग



कु. वृषाली प्रसादे

१) आय आय टी, पवई यांनी आयोजित केलेल्या ज्युनिअर गणित प्रज्ञा शोध परीक्षेत कु. वृषाली प्रसादे हिला प्रथम क्रमांक मिळाला.

२) मिझोराम येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील टेबल टेनिस स्पर्धेत कु. वृषाली प्रसादे आणि कु. रुचा अमडेकर यांची महाराष्ट्रराज्याचे प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

३) खालील विद्यार्थी MCA-Gile shield आंतरशालेय क्रिकेट स्पर्धाचे उपविजेते ठरले.

i) विराज दिवेकर
ii) केयूर छेडा
iii) चिन्मय पोटे
iv) आदित्य बोत्रे
v) रमेश विसारिया
vi) शाम गोस्वामी
vii) अमोघ सोनार
viii) यश काळे
ix) आदित्य साटम
x) लौकिक कोटवडेकर
xi) गंधार बेडेकर
xii) रोहन महाडिक
xiii) सुमीत म्हात्रे
xiv) अक्षय सोनिगरा
xv) पुष्कर मेहता
xvi) सॅमसन सोलोमण
xvii) मिहीर म्हात्रे

४) कु. ऐश्वर्या ओक हिची नॅशनल स्कूल गेम्स फेडरेशन मध्ये १४ वर्षाखालील गटात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली.

५) व्यास क्रिएशन आयोजित (मराठी) काव्यरचना स्पर्धेत, संपूर्ण कोकण विभागातून मिहीर कुलकर्णी यांस प्रथम तर मधुरा गोडबोले हिस तृतीय पारितोषिक मिळाले.

६) वैचारिक देवाण घेवाण कार्यक्रमांतर्गत डॉ. बेडेकर विद्या मंदिर मधील इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण मराठी पाठ्य पुस्तकावर आधारित कार्यक्रम सादर केला. नंतर ए. के. जोशीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. (हायड्रोपोनिक्स, रासायनिक आणि सेंद्रिय खतांचा उपयोग) नंतर बेडेकरच्या विद्यार्थ्यांनी भूगोल आणि गणित प्रयोगशाळेला भेट दिली.

७) ठाणे येथे १७ नोव्हें. रोजी झालेल्या बालशिक्षण परिषदेत पूर्णिमा साठे यांनी 'प्राथमिक गणित समजणे आणि शिकवणे' या विषयावर सादरीकरण केले.

सादरीकणाचा विषय हा श्री. लिपिंग मा यांच्या शोधावर होता. ज्यात चिनी आणि अमेरिकन शिक्षकांच्या गणित विषय शिकवण्याच्या पद्धतीची तुलना केली गेली. त्यातून असा निष्कर्ष निघाला की, चिनी शिक्षकांच्या गणिताच्या मूळ संकल्पना स्पष्ट करण्याच्या पद्धती अमेरिकन शिक्षकांपेक्षा अधिक प्रभावी आहेत.

हे सादरीकरण संवाद स्वरूपांत होते आणि महाराष्ट्रभरातून आलेल्या सर्व शिक्षकांना (जवळजवळ ५००) ते अतिशय आवडले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

• २२ नोव्हेंबर रोजी 'विद्यार्थी प्रतिनिधी मंडल' तर्फे 'मदर्स डे' आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम कात्यायन सभागृहात सकाळी ११.३० वा. साजरा करण्यात आला.

• २८ नोव्हेंबर रोजी कार्यशाळा पूर्व प्रथम परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापकांनी 'Indian Philosophy: Its relevance in 21st century' या विषयावर शोधनिबंध सादर केले. उर्वरित शोधनिबंधाचे सादरीकरण ५ डिसेंबर रोजी झाले.

• ३० नोव्हेंबर रोजी महाविद्यालयाच्या 'फिल्म सोसायटी' तर्फे 'Yesterday' हा दक्षिण अफ्रिकेत २००४ मधे प्रदर्शित झालेला चित्रपट दाखविण्यात आला.

• ४ डिसेंबर रोजी कात्यायन सभागृहात स्त्री-मुक्ती संघटनेतर्फे 'मुलगी झाली हो' हा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला.

• ७ डिसेंबर रोजी 'ओॲसिस नेचर क्लब' तर्फे 'स्लाइड-शो' दाखविण्यात आला. त्याच दिवशी कात्यायन-सभागृहात 'स्त्री-अत्याचार-सामाजिक व कायदेशीर परिणाम' या विषयावर ॲड. सौ. माधवी नाईक यांचे व्याख्यान झाले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

• 'महिला विकास गटातर्फे' श्रीमती श्रीविद्या जयकुमार, प्रभारी प्राचार्या, टी.एम.सी. विधी महाविद्यालय, ठाणे यांचे दिनांक २८ नोव्हेंबर रोजी महिला आणि कायदा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

• महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी दिनांक १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या आवारात रॅली आयोजित केली होती. या रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या उप प्राचार्या श्रीमती अकोलकर मॅडम व अक्षदा सेवाभावी संस्थेच्या श्रीमती विनिता मॅडम या उपस्थित होत्या. रॅलीनंतर श्रीमती विनिता मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एड्स अवेअरनेस या विषयावर भाषण दिले.

• विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या उर्जा क्लबतर्फे दिनांक ११ डिसेंबर रोजी श्री नीरज लाड, ऑर्बिट प्लेसमेंट, ठाणे व श्री आनंद नरसुळे, स्मरण ॲडव्हरटायझिंग, ठाणे या दोन माजी विद्यार्थ्यांनी तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना मुलाखतीची तंत्रे या विषयावर व्याख्यान दिले.

## वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन




श्रीयुत भास्कर काशीराम पोयरेकर

वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमधील केमिकल इंजिनिअरिंग विभागात प्रयोगशाळा परिचर म्हणून भास्कर पोयरेकर कार्यरत होते. ते ३० नोव्हेंबर २००७ रोजी आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. भास्कर पोयरेकर हे तंत्रनिकेतनात १ डिसेंबर १९८८ पासुन सेवेत रूजू झाले होते. जवळ-जवळ १९ वर्षे हे कार्यरत होते. तंत्रनिकेतनतर्फे दि.कृ. नायक यांचे हस्ते त्यांना निरोप समारंभाप्रसंगी भेट

वस्तू देण्यात आली. तसेच अशासकीय शिक्षकेतर कर्मचारी युनियन-तंत्रनिकेतन युनिट तर्फे त्यांना भेट वस्तू, शाल, श्रीफळ देऊन प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निरोप प्रसंगी तंत्रनिकेतना चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी पोयरेकर यांच्या संबंधी प्राचार्य नायक व युनिट प्रमुख संतोष शेलार यांनी आपली मनोगते मांडली.

## वि.प्र. मंडळाचे विधी महाविद्यालय

**नेट उत्तीर्ण**



**श्री. आनंद महादेव कासले**

वि.प्र.म. चे टी.एम्.सी. विधी महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. अनंत कासले हे राष्ट्रीय अधिव्याख्याता पात्रता चाचणी, म्हणजे नेट परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

हार्दिक अभिनंदन!

•••

## थ्रीडेसी प्रकल्पाबद्दल

'प्रकल्प' ही संपूर्णपणे नवनिर्माणाची कृती आहे. अशा शब्दांत स्टीलमन रॉबिन्सन यांनी प्रकल्पाची व्याख्या केली आहे. प्रकल्प म्हणजे मेंदूला मिळालेले एक वेगळे खाद्य आहे. कारण प्रत्येक प्रकल्प हा तुम्हाला स्वतःला विचार प्रवृत्त करणारा व कलागुणांना पुढे नेणारा असतो. वर्गातील चार भिंतींना ओलांडत तो तुम्हाला खऱ्या अर्थाने समाजाशी नातं जोडण्याचा 'सराव' असतो.

या 'प्रकल्प' अभ्यासामुळे तुम्हांला होणारे फायदे-

एक : तुम्हांला स्वयंअध्ययनाची सवय लागते.

दोन : कुवतीचा आणि शक्तीचा तुम्हाला खरा प्रत्यय येतो.

तीन : निरीक्षण शक्ती वाढते.

चार : तर्कसंगत विचार करायला शिकता येते.

पाच : तारतम्य येते.

सहा : वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, सहकार्य, आंतरक्रिया या गुणांची चांगली वाढ होते.

सात : एकाग्रता वाढते. 'चिकाटी' हा गुण वाढीस लागतो.

प्रकल्प ४ ते ५ प्रकारचे असतात.

१) निर्मितीप्रधान २) संग्रहमूल्य असलेले ३) सर्वेक्षणात्मक ४) संशोधनात्मक ५) व्यक्तिगत व सांघिक प्रकल्प

सुनीता गणपुले
बी२/१०४ विकास कॉम्प्लेक्स,
एल.बी. शास्त्री मार्ग, ठाणे (प) ४०० ६०१

संपादक 'दिशा'
विद्या प्रसारक मंडल,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

स.न.

'दिशा' ऑक्टो.०७ च्या आपल्या अंकात आपण अगत्याने केलेला माझा लेख 'होळकरशाहीच्या इतिहासाची साधने-खंड २ साठी -दोन प्रस्तावना' याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद!

प्रस्तुत लेखातील एका महत्त्वपूर्ण शब्दाची दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक वाटते. ती पुढील प्रमाणे-

पृ. १९ ते २४ मधील मजकूरातून- 'सौ. कमलाबाई किणे' असा शब्दप्रयोग छापला आहे तो योग्य नसून 'किणे' ऐवजी 'किबे' असे हवे. कृपया प्रत्येक ठिकाणी 'किणे' ऐवजी 'किबे' असे वाचकांनी वाचावे ही नम्र विनंती.

तसदीबद्दल अत्यंत दिलगीर आहे.

आ. स्ने.

सुनीता गणपुले
दू. ध्व. २५४७०५८९

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. बेडेकर विद्या मंदिर | (मराठी माध्यम) |
| २) | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय | (इंग्रजी) |
| ५) | बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय | |
| ६) | के. ग. जोशी कला महाविद्यालय | |
| ७) | ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय | |
| ८) | वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय | |
| ९) | वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन | |
| १०) | प्रगत अभ्यास केंद्र | |
| ११) | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था | |

मुखपृष्ठावरून

संपादकीय

## न कळे यातुनि काय साधिसी...

झाले आहे. मानवी नातेसंबंध, माणसा माणसातील लागतेपण, आपुलकी यात आज अस्वस्थ करेल अशी बधिरता आली आहे. यासाठी सर्व शक्तीनिशी राजकारणं खेळायची. माणसांची प्यादी बनवायची स्पर्धा सर्वच क्षेत्रात फोफावत चालली आहे. हे वास्तव आहे. त्याबद्दल वाईट वाटणे, चांगले वाटणे हे संदर्भ संपून जात आहेत.

या सर्व वातावरणाचा परिणाम एकमेकांशी संवाद संपण्यात झालेला दिसतो. कुटुंबातील संवाद तर संपला आहेच पण व्यावसायिक जीवनातही वरिष्ठ व अन्य संबंधित सहकारी यांच्यात संवाद संपला. आत्मकेंद्रित दृष्टिकोनामुळे सामायिक कामांतही तुटकपणा वाढला. आपण कोणाला तरी उत्तर देण्यात बांधील आहोत ही भावना लोप पावली. त्यामुळे कोणी कोणाला विचारत नाही, कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी घातक स्थिती निर्माण झाली. मी अधिक पैसा मिळवला की, माझी अधिक प्रगती झाली, या समीकरणामुळे पैसा हे सर्वस्व झाले. राजकीय क्षेत्रात उमेदवार विकत घेणे यासाठी जी बैलबाजार ही संज्ञा वापरतात त्या बैल बाजाराची अवस्था जीवनाला प्राप्त झाली. माझ्यापेक्षा कोणी सरस ठरणार आहे, तो तसा ठरला तर त्याला सहकार्य करायला हवे हे मी मी म्हणणाऱ्या सुशिक्षितांना (म्हणजे पदव्या प्राप्त केलेल्यांना, जमत नाही. कारण 'मला पहा, कुंकू वहा' ही वृत्ती बनत चालली आहे. 'मराठी माणसे खेकड्यासारखी असतात' असे म्हणतात, पण हे मराठीच कशाला, पैसा आणि पैशाने मोजायचं यश डोक्यात गेलेल्या कोणाही बाबतीत खरे आहे!

जमिनीवर पाय न ठरणाऱ्या या परिस्थितीतून यश, चंगळ, भरभराट, प्रगती यांच्या संकल्पना बदलल्या. त्या नुसत्या बदलल्या असत्या तरी मान्य होण्यासारखे होते; पण त्या विकृत झाल्या. अनेक चुकीच्या किंवा अनावश्यक बाबींना यातूनच समाजमान्यता मिळत गेली. उदा. 'स्वतःची गाडी असणे', 'आठवड्यातून एकदा तरी हॉटेलिंग करणे', 'दारूचे व्यसन किंवा विरुद्ध टोकाची धार्मिकता मिरवणे'. यांचे समाजजीवनावर व पर्यायाने व्यक्ती जीवनावरही दूरगामी, वाईट परिणाम होत आहेत. आणि हवा डोक्यात गेलेली अशी माणसे स्वतःला 'सिद्ध' करायला वाटेल ते करतात. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर त्यांचा व्यक्तिमत्त्वाचा प्रकार हुकूमशाही व्यक्तिमत्त्वात मोडतो!

या सर्वात नाते संबंधातील परिवर्तन अधिक गंभीर आहे. प्रत्येक नाते पैसा व उपयुक्ततेच्या तराजूत तोलले जात आहे. गरज संपली की एखाद्या माणसाशी असणारे जुने नातेही अमान्य करून, नाकारून माणसाला फेकून देण्यापर्यंत माणसे वागतात, तेव्हा प्रगतीचे अधिष्ठान चुकीच्या दिशेने तोंड फिरवते. दुर्दैवाने या अंतरांमधील कुटिलता जपणारांना देवत्व बहाल करणारे ही असतात. त्यांना कुंकू वहात राहणं हा स्वतःचा स्वभाव बनवतात. राजकारणापासून समाजापर्यंत सर्वत्र हे दिसते. तेव्हा 'परिवर्तन' अपरिहार्य असते. तरी ते मनात प्रश्नांचे प्रतिध्वनी धुमसत ठेवते.

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.